दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

वैभव विवेक स्वामी
संपादक

SAMARTH RAJYOG

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२७३ शुक्रवार दि.१२ जुन २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-273 Friday, Dt.12 June 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# राक्षसभूवन अवैध वाळू उपसा प्रकरणी जिल्हा प्रशासनाची सर्वात मोठी धडक कारवाई

## तहसिलदार संदीप खोमणे यांच्यासह नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी आणि कोतवाल या पदांवरील ५० कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या आहेत





गेवराई (प्रतिनिधी) गेवराई तालुक्यातील राक्षसभूवन येथील गोदावरी पात्रातून घरकूल लाभार्थ्यांच्या नावे झालेल्या बोगस वाळू उपसा प्रकरणात जिल्हा प्रशासनाने इतिहासातील सर्वात मोठी धडक कारवाई केली आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तीन दिवसांच्या सखोल चौकशी अहवालाच्या आधारे तहसिलदारापासून कोतवालापर्यंत व ग्रामसेवक ५० महसूल कर्मचाऱ्यांना निलंबित का करू नये, अशा कारणे दाखवा नोटीसा बजावल्या आहेत. या कारवाईमुळे संपूर्ण बीड जिल्हा महसूल प्रशासनात खळबळ उडाली असून वाळू माफियांचेही धाबे दणाणले आहेत.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी काही महिन्यांपूर्वी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर केली होती. तक्रारीत म्हटले होते की, राक्षसभूवन येथील ७४३ घरकूल लाभार्थ्यांना प्रत्येकी ५ ब्रास मोफत वाळू देण्याचा निर्णय महसूल प्रशासनाने घेतला. मात्र प्रत्यक्षात या नावाखाली मोठ्या प्रमाणावर बोगस नोंदी करून वाळू माफियांना अवैध उत्खनासाठी मोकळीक देण्यात आली.

आमदारांच्या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तातडीने राक्षसभूवन गोदापात्रातील उपसाचे ईटीएस तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मोजमाप करून घेतले. शासकीय नोंदींनुसार ३ हजार ७१५ ब्रास वाळूचे वाटप झाल्याचे दाखवण्यात आले होते. परंतु प्रत्यक्ष मोजमापात २३ हजार ७० ब्रासपेक्षा अधिक वाळूचा उपसा झाल्याचे उघड झाले. म्हणजेच कागदोपत्री आणि प्रत्यक्षात जवळपास २० हजार ब्रासची तफावत आढळून आली.

याच प्रकरणाच्या चौकशीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल, पोलीस आणि तंत्रज्ञान विभागातील ४० अधिकाऱ्यांचे विशेष पथक नेमले होते. या पथकाने तीन दिवस रात्रंदिवस काम करून प्रत्येक घरकूल लाभार्थ्यांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. चौकशीत समोर आले की, अनेक लाभार्थ्यांना याबत माहितीच नव्हती. काहींना शासनाच्या इतर योजनांचे पैसे मिळवून देतो असे सांगून त्यांच्याकडून ओटीपी घेण्यात आले आणि त्याच नावावर बनावट नोंदी करून वाळू उपसल्याचे दाखवण्यात आले,

पथकाने सादर केलेल्या गोपनीय अहवालात स्थानिक महसूल प्रशासनाने शिस्तभंग करून शासनाची थेट फसवणूक केल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. अहवालात असेही नमूद आहे की, ईटीपी प्रणालीतही फेरफार करून बनावट नोंदी तयार करण्यात आल्या होत्या.

या अहवालाच्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांनी गेवराईचे तहसिलदार संदीप खोमणे यांच्यासह नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी आणि कोतवाल या पदांवरील ५० कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या आहेत. नोटीसमध्ये तुम्हाला सेवेतून निलंबित का करू नये, असा थेट सवाल करण्यात आला आहे. २४ तासांत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

जिल्हा प्रशासनाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, पर्यावरण संरक्षण कायदा आणि भारतीय दंड संहिता अंतर्ग फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रियाही सुरू आहे. ज्या वाहनांद्वारे अवैध वाळूची वाहतूक झाली, ती वाहने जप्त करून कोट्यवधी रुपयांचा दंड आकारण्याची तयारी सुरू आहे.

या कारवाईमुळे गेवराई महसूल कार्यालयात एकच खळबळ उडाली आहे. अनेक कर्मचारी आपल्या बचावासाठी वरिष्ठांकडे धाव घेताना दिसत आहेत. दुसरीकडे स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. त्यांचे म्हणणे आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून राक्षसभूवन परिसरात वाळू माफियांचा उच्छाद सुरू होता. प्रशासनाच्या या कारवाईमुळे अवैध उत्खनाला आळा बसेल अशी अपेक्षा आहे.

राजकीय वर्तुळातही या कारवाईची जोरदार चर्चा सुरू आहे. आमदार विजयसिंह पंडित यांनी सांगितले की, गरिबांच्या घरकूलाच्या नावाखाली झालेला हा घोटाळा असून दोषींना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. यापुढेही जिल्ह्यातील इतर ठिकाणच्या अवैध वाळू उपसाची चौकशी करून कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या प्रकरणाशी निगडीत असलेल्या वाळू माफियांच्या हालचालींवरही पोलिसांनी नजर ठेवली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, महसूल कर्मचाऱ्यांवर कारवाई करून हा विषय थांबणार नाही. वाळू माफिया आणि त्यांना मदत करणाऱ्या प्रत्येकावर फौजदारी कारवाई केली जाईल.

# वाढदिवस साजरा न करण्याचा अशोक डक यांचा निर्णय

**स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाच्या दु:खद पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना आवाहन**

माजलगाव /प्रतिनिधी :

कृषी उत्पन्न बाजार समिती मुंबईचे माजी सभापती तथा कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगावचे संचालक अशोक गोविंदराव डक यांनी १२ जून रोजी असलेला आपला वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री लोकनेते अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दु:खद निधन झाल्याने संपूर्ण महाराष्ट्रासह ते स्वत:ही अत्यंत शोकाकुल आहेत. या दु:खद घटनेच्या पार्श्वभूमीवर यंदा वाढदिवस साजरा करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

तसेच आपल्या वाढदिवसानिमित्त मित्र, कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी बॅनर, हार, तुरे, बुके आदींवर कोणताही खर्च करू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे. आपल्या सदिच्छा आणि प्रेम हेच कायम पाठिशी राहावे, हीच अपेक्षा असल्याचे त्यांनी नमूद करत सर्वांचे लोकप्रिय असलेले अजित दादा हे वृक्षप्रेमी होते त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ सर्वांनी वृक्षारोपण करावे असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. अशोक डक यांच्या या निर्णयाचे विविध स्तरातून स्वागत होत



असून, दु:खद प्रसंगी साधेपणा आणि संवेदनशीलतेचा संदेश देणारा हा निर्णय असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# आईचा चारधाम दर्शनाचा संकल्प लेक करतेयं पूर्ण!

## ना. पंकजाताई मुंडेंनी आई आणि बहिण प्रीतमताईंसह द्वारकेत घेतले दर्शन

मुंबई / प्रतिनिधी

चारधाम यात्रेचे दर्शन घडवून आणण्याचा आईसाठी केलेला संकल्प राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे पूर्ण करत आहेत. आज त्यांनी आई प्रज्ञाताई व बहिण माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासह द्वारकेत भगवान श्रीकृष्णाचे दर्शन घेतले. याठिकाणी देशातील एकमेव असलेल्या गो हॉस्पिटलला भेट दिली तसेच पंतप्रधान मोदींच्या यशस्वी कारकिर्दीबद्दल वृक्षारोपणही केले.

यासंदर्भात एक पोस्ट करत ना. पंकजाताईंनी आईचा चारधाम करण्याचा संकल्प पूर्ण करत असल्याचे म्हटले आहे. एक दिवस



मिळाला की आई आणि बहिण प्रीतमताईंसह आम्ही निघालो.आज देवभूमी द्वारका येथे श्री द्वारकाधीश मंदिराचे दर्शन घेण्याचे भाग्य लाभल्याचे त्यांनी म्हटले आहे. यावेळी द्वारकाधीश मंदिर ट्रस्ट आणि भाजपा पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. काही दिवसांपूर्वीच ना. पंकजाताईंनी आईला घेऊन बद्रिनाथ, केदारनाथ, गंगोत्री, यमुनोत्रीला जाऊन दर्शन घेतले होते.

**गो हॉस्पिटलला भेट ; वृक्षारोपणही केले**

भारतातील एकमेव आएसओ मानांकित गोमातेचे रुग्णालय असलेल्या 'द्वारकाधीश गो हॉस्पिटल' येथे ना. पंकजाताईंनी भेट देऊन पाहणी केली. गोसेवेचे हे अद्ययावत कार्य अतिशय कौतुकास्पद आहे. याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष रामजीभाई मैजीठीया, अशोक राजा व इतर सहकारी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश १२ वर्षे अविरतपणे विकासाच्या वाटेवर अग्रेसर आहे. देशातील सर्वात जास्त काळ पंतप्रधान म्हणून नेतृत्व करण्याचा ऐतिहासिक विक्रम त्यांनी कालच केला. याच औचित्याने आज देवभूमी द्वारका येथे स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांसमवेत ना. पंकजाताईंनी वृक्षारोपण केले.



बीड - दैनिक समर्थ राजयोग आणि साप्ताहिक शिववाणीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देताना माजलगावचे सर्वश्री पत्रकार परमेश्वर सोळंके,बाळासाहेब अडागळे,दिगंबर सोळंके,संपादक जितेंद्र शिरसाट,संपादक शेख ताहेर यांच्यासह मान्यवर.




बीड - दैनिक समर्थ राजयोग आणि साप्ताहिक शिववाणी चे संस्थापक संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ , मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देताना उद्योजक तथा कॉग्रेस पक्षाचे बीड शहराध्यक्ष परवेज भाई कुरेशी, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, पत्रकार किशोर देवा कुलकर्णी, जनशक्ती महाराष्ट्र न्यूज चॅनलच्या संपादिका ज्योती तुसांबड, सनी तुसांबड आदी मान्यवर उपस्थित होते.



बीड - दैनिक समर्थ राजयोग आणि साप्ताहिक शिववाणीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देताना पत्रकार संघाचे जिल्हा सह संघटक अमोल शिंदे.



बीड - दैनिक समर्थ राजयोग आणि साप्ताहिक शिववाणीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देताना पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष शेख ताहेर, जिल्हा उपाध्यक्ष शेख अय्युब, ज्येष्ठ समाजसेवक रमेश गंगाधरे सर, ग्रामीण पत्रकार रुपाली कचरे यांच्यासह मान्यवर.



बीड - दैनिक समर्थ राजयोग आणि साप्ताहिक शिववाणीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देताना दैनिक आरंभचे संपादक दीपक थोरात यांच्यासह मान्यवर.



बीड - दैनिक समर्थ राजयोग आणि साप्ताहिक शिववाणीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देताना प्र. उपसंचालक तथा बीडचे जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर, प्र. माहिती अधिकारी मिलिंद तुपसमुद्रे यांच्यासह जिल्हा माहिती कार्यालयातील सर्व कर्मचारी वृंद.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय....

# १२ वर्षांच्या प्रचारकाळात हरवलेला भारत

मोदी सरकारच्या बारा वर्षांच्या कारकीर्दीचा मोठा उत्सव साजरा केला जात आहे. जाहिरातींमधून यशाची अनेक उदाहरणे दिली जात आहेत. परंतु इतिहास जाहिरातींनी लिहिला जात नाही. इतिहास कारखाने मोजतो, संस्था मोजतो, रोजगार मोजतो, लोकशाहीची ताकद मोजतो आणि सामान्य माणसाच्या जीवनातील बदल मोजतो.

मोदी सरकारच्या बारा वर्षांच्या कारकीर्दीचा मोठा उत्सव साजरा केला जात आहे. जाहिरातींमधून यशाची अनेक उदाहरणे दिली जात आहेत. परंतु इतिहास जाहिरातींनी लिहिला जात नाही. इतिहास कारखाने मोजतो, संस्था मोजतो, रोजगार मोजतो, लोकशाहीची ताकद मोजतो आणि सामान्य माणसाच्या जीवनातील बदल मोजतो.

नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची बारा वर्षे पूर्ण केली आहेत. सरकारी जाहिराती, विशेष मोहिमा, सोशल मीडियावरील प्रचार आणि भाजप व मित्रपक्षाच्या नेत्यांची भाषणे यामधून या बारा वर्षांच्या संख्यात्मक कारकीर्दीचे गौरवगान केले जात आहे. मोदी हे जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी राहिलेले नेते ठरले आहेत, हा या प्रचाराचा केंद्रबिंदू आहे. ते सत्य नाही. जवाहरलाल नेहरू हे या देशाचे सर्वाधिक काळ पंतप्रधान राहिलेले आहेत हे ऐतिहासिक सत्य आहे. भाजपच्या दाव्यावर विश्वास ठेवला तर मग सरदार वल्लभभाई पटेल देशाचे गृहमंत्री कोणत्या काळात होते? डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. शामाप्रसाद मुखर्जी कोणत्या काळात केंद्रीय मंत्री होते? काही क्षणापुरता भाजपच्या खोट्या प्रचारावर विश्वास ठेवला तरी इतिहास केवळ सत्तेचा कालावधी मोजत नाही; तो त्या सत्तेने राष्ट्राला काय दिले याचे मूल्यमापन करतो. लोकशाहीत एखादा नेता किती काळ सत्तेत राहिला यापेक्षा त्या काळात त्याने कोणती संस्थात्मक पायाभरणी केली, अर्थव्यवस्थेला कोणती दिशा दिली, समाजात कोणते परिवर्तन घडवून आणले आणि पुढील पिढ्यांसाठी कोणता वारसा निर्माण केला, याला अधिक महत्त्व असते. म्हणूनच नरेंद्र मोदी यांच्या बारा वर्षांच्या कारकीर्दीचे मूल्यमापन करताना प्रचाराच्या झगमगाटापेक्षा वास्तवाच्या आरशात पाहण्याची गरज आहे.

घोषणांचे राजकारण आणि वास्तवातील तफावत

२०१४ मध्ये नरेंद्र मोदी सत्तेवर आले तेव्हा देशात मोठ्या अपेक्षांचे वातावरण होते. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, रोजगारनिर्मिती, आर्थिक विकास, शेतकरी, महिला सक्षमीकरण आणि जागतिक पातळीवर भारताचे नेतृत्व अशा अनेक आश्वासनांनी जनतेला आकर्षित केले. नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासून देशासमोर अनेक महत्त्वाकांक्षी आश्वासने ठेवली. प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये, दरवर्षी २ कोटी रोजगार, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, काळा पैसा परत आणणे, स्मार्ट सिटींची उभारणी, मेक इन इंडियाद्वारे उत्पादन क्षेत्रात क्रांती, गंगा शुद्धीकरण अशा अनेक घोषणांचा मोठा गाजावाजा केला.

# सातोना रेल्वे फाटकावर तपोवन
# एक्स्प्रेससमोर झेप घेऊन व्यक्तीची आत्महत्या

परतुर पिराजी गायकवाड :-

तालुक्यातील लिंगसा येथील रहिवासी रामभाऊ बाबण डवले यांनी सातोना खुर्द येथील रेल्वे फाटकाजवळ तपोवन एक्स्प्रेससमोर झेप घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली.मिळालेल्या माहितीनुसार, रामभाऊ डवले हे शुक्रवारी सकाळी सातोना खुर्द येथे आधार कार्डचे काम उरकण्यासाठी गेले होते. काम पूर्ण करून ते परत लिंगसा गावाकडे येत असताना सातोना येथील रेल्वे फाटकाजवळ आले. त्यावेळी रेल्वे फाटक बंद असतानाही त्यांनी फाटकाच्या आत प्रवेश केला. दुपारी सुमारे १२.१५ वाजण्याच्या सुमारास हुजूर साहेब नांदेड- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई तपोवन एक्स्प्रेस समोर झेप घेत आत्महत्या केली.



घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिक व संबंधित यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. प्राथमिक माहितीनुसार रामभाऊ डवले यांची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून ठीक नसल्याचे सांगण्यात येत आहे.

मृतदेहाचा पंचनामा करून तो पुढील तपासासाठी ताब्यात घेण्यात आला. त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र,सातोना येथे शवविच्छेदन पोस्टमार्टेम करण्यात आले. पोस्टमार्टेमनंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

सायंकाळी लिंगसा येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात रामभाऊ डवले यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवार असा मोठा परिवार आहे.

या घटनेमुळे लिंगसा व परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून गावावर शोककळा पसरली आहे.

# शिक्षणाधिकारी मयुरेश मोरे वैद्यकीय रजेवर

## भगवान सोनवणे यांच्याकडे अतिरिक्त पदभार

बीड, प्रतिनिधी : जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील प्रशासकीय कामकाज सुरळीत राहावे यासाठी शिक्षणाधिकारी मयुरेश मोरे यांच्या अनुपस्थितीत गटशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे यांच्याकडे अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी १० जून रोजी आदेश जारी केला.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्हा परिषदेत यापूर्वी नियोजन विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुणवर यांच्याकडे प्राथमिक शिक्षण विभागाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. त्यानंतर शासनाने मयुरेश मोरे यांची शिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती केली. त्यांनी २३ एप्रिल रोजी पदभार स्वीकारला होता.

मात्र, मयुरेश मोरे हे ८ जूनपासून वैद्यकीय रजेवर गेल्याने प्राथमिक शिक्षण विभागातील दैनंदिन प्रशासकीय कामकाज आणि शासकीय प्रक्रिया अखंडितपणे सुरू राहाव्यात, यासाठी गटशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार सोनवणे हे पुढील आदेशापर्यंत शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणार.

## आर्थिक व्यवहाराच्या वादातून लिपिकाला

# शेतात नेऊन चार तास अमानुष मारहाण

परळी, प्रतिनिधी : आर्थिक व्यवहाराच्या वादातून येथील महिला महाविद्यालयातील लिपिकाला शेतात काठ्या व बेल्टने मारहाण केल्याची धक्कादायक घटना ९ जून रोजी परळी येथे घडली. या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात वैजनाथ यादव व अन्य दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महिला महाविद्यालयात लिपिक म्हणून कार्यरत असलेले अनिल बाबुराव पत्की यांचे मंडप सजावट व्यवसायिक वैजनाथ यादव यांच्याशी आर्थिक व्यवहार होते. पत्की यांनी यादव यांच्याकडून घेतलेली एक लाख रुपयांची रक्कम परत केली होती. मात्र, त्यानंतरही यादव यांनी आणखी चार लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, २०२३ मध्ये यादव यांनी बँकेतून घेतलेल्या कर्जासाठी अनिल पत्की हे जामीनदार होते. या कर्जप्रकरणातून आपले नाव जामीनदार म्हणून कमी करण्याची विनंती पत्की यांनी केल्यानंतर दोघांमध्ये वाद निर्माण झाला होता.

या वादाचे रूपांतर गंभीर घटनेत झाले. ९ जून रोजी पाटकी यांना शेतात नेऊन वैजनाथ यादव व त्याच्या साथीदारांनी काठ्या आणि बेल्टच्या सहाय्याने सुमारे चार तास मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या मारहाणीत पाटकी यांना दुखापत झाली असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्यात आले.

घटनेनंतर पीडिताच्या तक्रारीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात वैजनाथ यादव व अन्य दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तपास सुरू केला असून आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.



## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड द्वारे जिल्हा न्यायालय परिसरात जागतीक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

नुकताच जागतीक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हा न्यायालय बीडच्या आवारात मा. श्री दिनेष पी. सुराणा साहेब, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीष तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डॉ. वहाब. ए. सय्यद यांच्या मार्गदर्षनाखाली वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मा. श्रीमती एस. आर. षिंदे, जिल्हा न्यायाधीष १ बीड श्रीमती एस. डी. सोनी, श्री. व्ही. एस. यादव व इतर मान्यवर न्यायिक अधिकायांच्या हस्ते न्यायालयाचे आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

त्यावेळी वृक्षरोपणाचे महत्व सांगुन पुढील पिढ्यांचे आयुश्य आनंदी व आरोग्यपुर्ण ठेवण्यासाठी प्रत्येकाने वृक्षरोपण व वृक्ष संवर्धन करणे आवष्यक आहे. असे आवाहन जिल्हा न्यायालय व विधी सेवा प्राधिकरणा तर्फे करण्यात आले.

सदर कार्यक्रमास बीड मुख्यालयातील न्यायीक अधिकारी व जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक श्री सुनिल पी. झेंड, जिल्हा न्यायालय व्यवस्थापक सुनिल पिंपळे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक श्री. एस. टी. षिंदे व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# मतदार पुनर्परीक्षण प्रोग्राम मध्ये बाहेर जिल्ह्यातील व बाहेर राज्यातील बोगस मतदारांची नावे शोधून तात्काळ कमी करा - मा.आ. विजय भांबळे

जिंतूर (प्रतिनिधी)

जिंतूर;मतदार पुनर्परीक्षण प्रोग्राम मध्ये बाहेर जिल्ह्यातील व बाहेर राज्यातील विद्यार्थी शिक्षणासाठी जिंतूर-सेलू तालुक्यात आलेल्या विद्यार्थ्यांची नावे ईतर जिल्ह्यात असल्याने अशा बोगस मतदारांची नावे शोधून तात्काळ कमी करणे व संबंधितांवर गुन्हे नोंद करणे या बाबत लेखी निवेदनाद्वारे तहसीलदार जिंतूर यांना मा.आ.विजयराव भांबळे व शिष्ट मंडळ यांनी निवेदन दिले. त्यात जिंतूर- सेलू तालुका ग्रामीण व शहर भागामध्ये अनेक विद्यार्थी व मजूर पर जिल्ह्यातून व ईतर राज्यातून शिक्षणासाठी व मजुरीसाठी आलेल्या नागरिकांची बोगस नावे जिंतूर-सेलू विधानसभा मतदारसंघांच्या मतदार यादीत समाविष्ट केलेली आहेत. सदर विद्यार्थी व मजूर ईतर जिल्हा व राज्याचे मूळ रहिवासी असताना काही राजकीय लोकांनी स्वार्थापोटी पाच ते दहा हजार मतदार जिंतूर-सेलू विधानसभा मतदारसंघांच्या मतदार यादीत समाविष्ट केलेली आहेत, जे कि बोगस आहेत ते कमी करण्यात यावेत. तसेच काही विशिष्ट समाजाचे नावे जाणीवपूर्वक कमी करण्यात येत आहेत ती कमी करण्यात येऊ नयेत.त्यामुळे सदर बोगस मतदार तात्काळ शोधून त्यांची नावे तात्काळ कमी करण्यात यावीत व अशा बोगस मतदारांवर गुन्हा नोंद करण्यात यावा. तसेच खालील मुद्दे निहाय कार्यवाही करण्यात यावी.अनोळखी मतदार यांची शहानिशा करून सदर नावे तात्काळ कमी करण्यात यावेत.विवाहित मुलींची नावे सासरी व माहेरी असल्याने त्यांची नावे एकाच ठिकाणी ठेवण्यात यावीत.२००२ च्या मतदार यादीतील पुरावा बघून नवीन मतदारांची नावे (आई-वडिलांच्या नावाखाली मुलांची नावे जोडणे) समाविष्ट करणे.अनेक मतदारांची नावे दोन ठिकाणी देखील असतात त्यामुळे त्यांची शहानिशा करून त्यांची नावे एकाच ठिकाणी ठेवण्यात यावेत.मयत मतदार वगळण्यात यावेत.ज्या मतदारांचे आधार कार्ड ज्या ठिकाणचे आहे त्याचे नाव त्याच ठिकाणी ठेवण्यात यावे त्यासाठी बोगस आधार कार्डाची देखील तपासणी करूनच सदर नाव ठेवण्यात यावे असे निवेदनात म्हटले आहे.



यावेळी मा.आ.विजयराव भांबळे, लक्ष्मणराव बुधवंत, केशवराव बुधवंत, बाळासाहेब भांबळे, माणिकराव हरकळ, शंकर जाधव, विठ्ठल घोगरे, अशोकराव बंड, जाबेर भाई, करीम लाला, शाहेद बेग मिर्झा, पं.स.सदस्य नंदकुमार अंभोरे, अविनाश मस्के, सय्यद आवेस रहिमत गणेशराव इलग, विजयराव खिस्ते, कैलास महाराज देशमुख, माधव घोगरे, अहेमद बागबान, दत्तराव काळे, प्रवीण चव्हाण, राहुल घुले, रोहिदास राठोड, रवी नागरे, खयुम कादरी, यादवराव हूलगुंडे, गुलाबराव बांगर, ज्ञानेश्वर आव्हाड, सादेक कुरेशी, हकीम लाला, उद्धव कुटे, विष्णू काळे, रामप्रसाद देवकर, नाना निकाळजे, गणेश ठोंबरे, सुखदेव सरकटे, पिंटू वालेकर, जलीलभाई इनामदार, यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# बोंबला ! होर्मुज खाडी बंद ;
# भारतावर गंभीर परिणाम

## पेट्रोल- डिझेल आणखी महागणार, सीटीआय ने वाढवले टेन्शन

दिल्ली / वृत्तसंस्था

इराण आणि अमेरिका यांच्यात तणाव पुन्हा एकदा वाढला आहे. होर्मुज जवळ इराणने आपले हेलिकॉप्टर पाडल्याचा दावा अमेरिकेकडून करण्यात आला. त्यानंतर अमेरिकेने मोठे हवाई हल्ले इराणवर केले. गेल्या दोन दिवसांपासून इराणवर मोठे हल्ले सुरू आहेत. इराणचे प्रमुख शहर अमेरिकेच्या निशाण्यावर आहेत. आम्ही अमेरिकेचे हेलिकॉप्टर पाडल्याचा दावा खोटा असल्याचे सांगत इराणने म्हटले की, आम्ही काहीही झाले तरीही हार मानणार नाहीत. अमेरिकेला धडा शिकवण्यासाठी इराणने थेट होर्मुज खाडी बंद करण्याचा निर्णय घेतला. आता होर्मुज खाडी पूर्णपणे बंद आहे. होर्मुज खाडीतून एकही जहाज येऊ शकत नाही. इराणने म्हटले की, जर कोणी होर्मुज खाडी पार करण्याची हिंमत केली तर थेट उडवून दिले जाईल. आता जगाची चिंता वाढली असून होर्मुज खाडी पूर्णपणे बंद आहे.होर्मुज खाडी पूर्णपणे बंद असणे ही भारतासाठी अत्यंत मोठी धोक्याची घंटा आहे. पश्चिम आशियातील तणावामुळे जंग अस्थिरतेच्या संकटात आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार दिलेल्या धमक्यांमुळे चिंता वाढली. या परिस्थितीबाबत भारतातील प्रमुख व्यापार आणि उद्योग संघटना असलेल्या चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्रीने चिंता व्यक्त केली आहे. कारण याचा घातक परिणाम थेट भारतावर होईल. सीआईटी चे अध्यक्ष ब्रिजेश गोयल यांनी एक निवदेन जारी केले. त्यात त्यांनी म्हटले की, २० टक्के तेल याच मार्गाने येते. जर होर्मुज खाडी काही काळ बंद राहिली तर १९७० नंतरचे सर्वात मोठे ऊर्जा संकट येऊ शकते. पेट्रोल व डिझेलसह तेलाच्या किमतीत अचानक मोठी वाढ होऊ शकते. गेल्या काही दिवसांपासून जागतिक बाजारात सतत कच्च्या तेलाच्या किमतीमध्ये मोठी वाढ होताना दिसत आहे. इराण आणि अमेरिका युद्धात होर्मुज खाडी कधीच पूर्णपणे बंद नव्हती. इराण थोड्या कमी प्रमाणात पण जहाजांना सुरक्षित मार्ग देत होता. आता होर्मुज खाडी इराणकडून पूर्णपणे बंद करण्यात आली. होर्मुज खाडी बंद असल्याने फक्त भारतच नाही तर जग संकटात आहे. अमेरिकेच्या मोठे हल्ले करत असतानाच इराणकडून थेट होर्मुज खाडीत बंद करण्यात आली. इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्ध सतत वाढत आहे. याचा भारतावर अत्यंत गंभीर परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. येत्या काळामध्ये सगळ्याच प्रकाराची महागाई वाढण्यासोबतच इतर अनेक तांत्रिक समस्या भारतामध्ये निर्माण होण्याची शक्यता आहे.




होर्मुज खाडीतून अत्यंत धक्कादायक बातमी पुढे येत आहे. ओमान खाडीजवळ अमेरिकेने जहाजावर मोठा हल्ला केला. या हल्ल्यात दोन भारतीय खलाश्यांचा मृत्यू झाला. एकाचा शोध सुरू आहे. होर्मुज खाडीत तणाव वाढत आहे. होर्मुज खाडीजवळ इराणने अमेरिकेचे एक हेलिकॉप्टर पाडले. त्यानंतर अमेरिकेने थेट इराणवर हल्ले केले. अमेरिकेने केलेल्या हल्ल्यानंतर इराणकडून थेट होर्मुज खाडी बंद करण्यात आली. होर्मुज खाडी बंद असल्याने अनेक देश संकटात आलेत. इराणकडून धमकी देण्यात आली की, जर कोणत्याही प्रकारच्या जहाजाने होर्मुज खाडी पार करण्याचा प्रयत्न केला तर सरळ उडवून टाकले जाईल. अमेरिकेनेही इराण जवळ नाकेबंदी केली. त्यामध्येच इराणच्या दिशेने जाणाऱ्या जहाजावर अमेरिका हल्ले करत आहे. एका जहाजावर अमेरिकेने मोठा हल्ला केला. त्यात दोन भारतीयांचा मृत्यू झाला तर एकाचा शोध सुरू आहे.

## पदाधिकारी आढावा बैठकीस बहुसंख्येने उपस्थित राहावे

### जिल्हाप्रमुख गणेश वरेकर व उल्हास गिराम

बीड (प्रतिनीधी):- बीड जिल्हा पदाधिकारी आढावा बैठकीचे आयोजन दि.१२ जुन २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता हॉटेल निलकमल, नगर रोड बीड येथे करण्यात आले आहे. सदरील बैठकीस माजी विरोधीपक्षनेते तथा आमदार अंबादासदादा दानवे हे आढावा घेणार आहेत तसेच मार्गदर्शनही करणार आहेत.

या आढावा बैठकीत बी.एल.ए नियुक्ती, स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघ, पदवीधर मतदार संघ तथा स्थानिक संघटनात्मक मुद्द्यांबाबत आढावा घेण्यात येणार आहे.सदरील बैठकीस जिल्हा संपर्कप्रमुख, विधानसभा संपर्कप्रमुख, आजी-माजी खासदार आमदार, जिल्हाप्रमुख,



उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, महिला आघाडी, युवासेना, सर्व जिल्हास्तरीय पदाधिकारी या सर्वांनी बहुसंख्येने वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख गणेश वरेकर व उल्हास गिराम यांनी केले आहे.

## महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांनाच विजयी करा - बदामराव पंडित

# गेवराईला निधी कमी पडू देणार नाही - बसवराज पाटील

गेवराई ( प्रतिनिधी ) विधान परिषद निवडणुकीत नेहमीच बीड जिल्ह्यात भाजपचा प्रभाव राहिला आहे. यावेळीही बीड जिल्ह्याच्या विकासाला अधिक गती देण्यासाठी लातूर- बीड-धाराशिव या विधान परिषद मतदार संघातील महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांनाच प्रचंड मताधिक्याने विजय करा असे आवाहन भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

लातूर -बीड -धाराशिव या विधान परिषद मतदार संघातील भाजपा शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस व मित्र पक्ष या महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज पाटील यांच्या प्रचारार्थ दिनांक ११ जून २०२६ रोजी दुपारी १ वाजता गेवराई येथील माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी बैठक संपन्न झाली. या बैठकीत मतदारांशी संवाद साधताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित बोलत होते. याप्रसंगी उमेदवार बसवराज पाटील, आष्टी,पाटोदा,शिरूरचे आमदार भाजपाचे नेते सुरेश धस, औसाचे आ अभिमन्यू पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, जि प चे माजी अर्थ व बांधकाम सभापती यूधाजित पंडित, युवानेते शामराव पवार, गेवराई भाजप समन्वयक श्रीकांत सानप, युवानेते यशराज पंडित, उपनगराध्यक्ष ऍड भगवानराव घुंबार्डे, भाजप गटनेते ऍड राजेंद्र राक्षसभुवनकर, भाजप तालुकाध्यक्ष सचिन दाभाडे, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, सरपंच कैलास माने आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, राज्यातील महायुती सरकारने सामान्य जनतेच्या हिताचे आणि विकासाचे अनेक निर्णय घेतल्याने जनता महायुतीच्या सोबत आहे. त्यामुळे बसवराज पाटील यांचा मोठ्या मताधिक्याने विजय होईल. यासाठी गेवराई मतदार संघातून त्यांच्या पाठीशी मी आणि बाळराजे पवार पूर्ण ताकद देऊ असा विश्वासही बदामराव पंडित यांनी व्यक्त केला.

भाजप नेते आमदार सुरेश धस म्हणाले की, या मतदारसंघातून मी यापूर्वी निवडणूक लढवली आहे आणि निवडूनही आलो आहे. त्यावेळी मला औसा येथे आमदार असलेल्या बसवराज पाटील आणि गेवराईतून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्यासह अनेकांनी मदत केली. यावेळी त्याच जागेवर बसवराज पाटील हे निवडणूक लढत आहेत. आता मी आमदार आहे आणि बदामराव पंडित परत गेवराईत आहेत आणि त्यांच्या सोबतच बाळराजे पवार हेही आहेत. याच वेळी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे आणि बीड जिल्ह्यातील महायुतीचे सर्व लोकप्रतिनिधी आणि मतदार एकजीवाने महायुती उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहेत. त्यामुळे बसवराज पाटील यांचा विजय मोठ्या मताधिक्याने होईल असा विश्वास सुरेश धस यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना बसवराज पाटील म्हणाले की लातूर, धाराशिवसह बीड जिल्ह्यातील मतदार आपल्याला मतदान करून आशीर्वाद देतील हा मला विश्वास आहे. यामध्ये गेवराई मतदार संघाचाही मोठा वाटा असेल. आपल्या विजयानंतर गेवराई तालुक्याला विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. या भागातली जी कामे असतील ती पूर्ण करण्याचा आपण प्रयत्न करू असा शब्दही त्यांनी दिला.

आभार प्रदर्शन ड राजेंद्र राक्षसभुवनकर यांनी केले. भाजप नेते बाळराजे पवार यांच्या मुलाचे लग्न असल्याने ते बाहेरगावी आहेत. त्यामळे आजच्या बैठकीला ते उपस्थित राहू शकले नाही असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी गेवराई नगर परिषदेचे नगरसेवक प्रशांत राख, राजेश टाक, माऊली बेदरे, सोपान मडके, ज्ञानेश्वर भाले, सलाउद्दीन बागवान, महेश सौंदरमल, सुभाष सुतार, सुमित्राताई थोरात, भारत धोंडलकर, शेख शेहदाद, सय्यद, सनी लाड, आप्पासाहेब कानगुडे, आबासाहेब काकडे मुन्ना मोटे आदींसह मतदार व भाजपा कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# कर्करोग औषधांच्या किंमतीत दरवाढ करू नये - डॉ.राजेश इंगोले

### दरवाढी विरोधात रूग्ण संघटनांकडून तीव्र निषेध

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

देशातील कर्करोग रूग्णांसाठी जीवदायी असलेल्या केमोथेरपी औषधांच्या किंमती केंद्र सरकारने जनतेच्या, रूग्णहिताला डावलून वाढविल्याच्या निर्णयाविरोधात रूग्ण संघटना, डॉक्टर आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी तीव्र निषेध नोंदवला आहे. केंद्र सरकारने कच्च्या मालाच्या वाढत्या किंमती आणि उत्पादन खर्चाचे कारण देत प्लॅटिनम - आधारित सिस्प्लॅटिन आणि कार्बोप्लॅटिन यांसह एकूण ४ कर्करोग औषधांच्या दरवाढीस मंजुरी दिली आहे. फुफ्फुस, अंडाशय, गर्भाशय, डोके-मान, मूत्राशय आणि पचनसंस्थेच्या कर्करोगाच्या उपचारात ही औषधे अत्यावश्यक मानली जातात.



इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी आधीच देशभर या जीवदायी औषधांचा तुटवडा आहे असे सांगून अनेक रूग्णालयांनी उपचारांचे वेळापत्रक बदलून औषधांचे रेशनिंग सुरू केले आहे असे म्हटले आहे. अशा स्थितीत दरवाढीचा निर्णय म्हणजे गरिबांच्या जीवाशी खेळ आहे. कर्करोग हा आधीच लाखो रूपये खर्च करणारा आजार आहे. दरवाढीमुळे अनेक रूग्ण उपचार परवडत नसल्याने अर्धवट सोडतील. त्यामुळे सरकारने ही दरवाढ अजिबात करू नये असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. औषध उत्पादक कंपन्यांनी ८२ औषधांच्या दरवाढीची मागणी केली होती. मात्र सरकारने केवळ ४ औषधांना मंजुरी दिली असली, तरी रूग्ण संघटनांचे म्हणणे आहे की ही सुरूवात आहे आणि पुढे आणखी दरवाढ होण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे रूग्णालयांवर अतिरिक्त भार पडला आहे. आधीच तुटवड्यामुळे रूग्णांना पर्यायी उपचार देण्याची वेळ अनेक रूग्णालयांवर आली आहे. दरवाढ झाल्याने रूग्णांवर आर्थिक भार वाढेल आणि सरकारी योजनांवरही अतिरिक्त ताण येईल. ही दरवाढ मानवीय दृष्टिकोनातून अयोग्य आहे असेही डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. पुढे डॉ.राजेश इंगोले यांनी कर्करोग हा रूग्ण आणी त्याच्या परिवारावर आलेले संकट असते यावर सरकारने सहानुभूती पूर्वक विचार करायचे सोडून सरकारने स्वीकारलेले दरवाढीचे धोरण धोकादायक आहे. जर दरवाढ मागे घेतली नाही, तर रूग्ण संघटना व डॉक्टरांच्या संघटनाद्वारे देशभर याविरूद्ध आंदोलन छेडले जाईल अशी माहिती डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी दिली. केंद्र सरकारने ही जीवदायी औषधीची दरवाढ करतांना दावा केला आहे की, तुट भरून काढण्यासाठी आणि उत्पादन सुरळीत राहावे यासाठी मर्यादित दरवाढ आवश्यक होती. मात्र रूग्णांच्या जीवाशी संबंधित बाबतीत हा तडजोडीचा हा मार्ग मान्य नाही, आणि हा तुघलकी निर्णय कॅन्सर रूग्णांच्या मूलभूत आरोग्य अधिकाराशी विसंगत अशी दरवाढ आहे

## पेशवा प्रतिष्ठानच्या बिनव्याजी शैक्षणिक मदत योजनेचे पहिले यश;विद्यार्थ्याचे एमबीबीएस शिक्षण पूर्ण



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक बळ देण्याच्या उद्देशाने पेशवा प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांनी सुरू केलेल्या बिनव्याजी शैक्षणिक मदत योजनेचा पहिला विद्यार्थी डॉ. पवन पंढरीनाथ कुलकर्णी हा आता वैद्यकीय शिक्षण (एमबीबीएस) पूर्ण करून डॉक्टर झाला आहे. ही बाब प्रतिष्ठानसाठी तसेच संपूर्ण अंबाजोगाई परिसरासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

आर्थिक अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची स्वप्ने अपूर्ण राहतात. ही गरज ओळखून पेशवा प्रतिष्ठानने काही वर्षांपूर्वी बिनव्याजी शैक्षणिक मदत योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना कोणतेही व्याज न आकारता आर्थिक मदत देण्यात येते, ज्यामुळे त्यांना शिक्षणाचा प्रवास निर्धास्तपणे पूर्ण करता येतो.

या योजनेचा लाभ घेणाऱ्या पवन कुलकर्णी या पहिल्या विद्यार्थ्याने एमबीबीएस पदवी यशस्वीरित्या संपादन करून प्रतिष्ठानच्या कार्याची सार्थता सिद्ध केली आहे. पवन कुलकर्णी यास मागील चार वर्षापासून दरवर्षी पन्नास हजाराची बिनव्याजी शैक्षणिक मदत करण्यात येते.विद्यार्थ्याच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून समाजातील दानशूर व्यक्तींनी अशा शैक्षणिक उपक्रमांना अधिकाधिक सहकार्य केल्यानेच सदरील उपक्रम सुरू आहे. पवन कुलकर्णी याने पेशवा प्रतिष्ठान व या उपक्रमास मदत करणाऱ्या दानशूर व्यक्तींचे आभार व्यक्त केले.

यावेळी पेशवा प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन करताना सांगितले की, शिक्षण हीच खरी समाजसेवा असून गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याचा आमचा संकल्प यापुढेही कायम राहील. पेशवा प्रतिष्ठान अश्याच समाजपयोगी कार्यासाठी कायम अग्रेसर राहील.

विद्यार्थ्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्याचे तसेच पेशवा प्रतिष्ठानच्या उपक्रमाचे कौतुक केले आहे. अधिक माहितीसाठी अमृत महाजन, सुजित दीक्षित, संतोष कुलकर्णी, राहुल कुलकर्णी, डॉ महेश अकोलकर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येते.

## दीनदयाल शोध संस्थान कृषी विज्ञान केंद्रातर्फे कळमअंबा येथे चारा टंचाई काळातील पशुधन व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन

केज/प्रतिनिधी

दीनदयाल शोध संस्थान कृषी विज्ञान केंद्र, अंबाजोगाई यांच्या वतीने दिनांक ११ जून २०२६ रोजी केज तालुक्यातील मौजे कळमअंबा येथे 'खेत बचाओ अभियान' अंतर्गत चारा टंचाई काळातील पशुधन व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.कार्यशाळेमध्ये शेतकऱ्यांना चारा टंचाईच्या परिस्थितीत पशुधनाचे शास्त्रीय व्यवस्थापन,पिकांमध्ये संतुलित खतांचा वापर तसेच एकात्मिक शेती पद्धतीचे महत्त्व या विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे प्रगतशील शेतकरी श्री. कांताराव दिगंबर इंगळे तसेच कृषी विज्ञान केंद्राचे पशुतज्ज्ञ डॉ. रवींद्र कोरके उपस्थित होते.शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. रवींद्र कोरके यांनी सांगितले की,कमी पावसाच्या परिस्थितीत पशुधनासाठी वर्षभर पुरेल इतका चारा उपलब्ध राहावा



यासाठी सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांनी ज्वारी,मका,बाजरी आदी चारा पिकांची लागवड करून मुरघास निर्मिती करावी.उपलब्ध चारा वाया जाऊ नये यासाठी चारा कुट्टी करून जनावरांना द्यावा.उच्च उत्पादन देणारी,वाढीच्या अवस्थेतील व गाभण जनावरांना उत्तम प्रतीचा चारा देणे आवश्यक असून कमी दूध देणारी व अनुत्पादक जनावरे स्वतंत्र ठेवून त्यांचे व्यवस्थापन करावे.

पशुधनाच्या आरोग्य व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी पावसाळ्यातील आजारांपासून संरक्षणा साठी नियमित लसीकरण व दर तीन महिन्यांनी जंतनिर्मूलन करण्याचे आवाहन केले. जनावरांच्या अंगावरील तसेच गोठ्यातील बाह्य परजीवींचे नियंत्रण करण्यासोबतच पशुधना च्या आहारात अपारंपरिक खाद्य स्रोतांचा समावेश करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. निकृष्ट प्रतीच्या चाऱ्यावर मीठ व युरिया प्रक्रिया केल्यास त्याची पौष्टिकता वाढते,तसेच अझोला उत्पादनाचा पशुखाद्यामध्ये समावेश केल्यास पोषणमूल्य वाढण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

याशिवाय पशुधनाचे आरोग्य सुधारण्यासाठी व भाकड काळ कमी करण्यासाठी खनिज मिश्रणांचा वापर, पचनक्रिया सुधारण्या साठी प्रोबायोटिक्सचा वापर तसेच निकृष्ट प्रतीच्या चाऱ्याची पचनीयता वाढविण्या साठी मेटाबोलाईट तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले.शेती विषयक मार्गदर्शन करताना डॉ. कोरके यांनी सध्याच्या काळात शेती उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे नमूद करून मृदापरीक्षण आधारित संतुलित खत व्यवस्थापनाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. रासायनिक खतांचा अतिरेकी वापर टाळून सेंद्रिय खतांचा वापर वाढविणे तसेच शाश्वत व लाभदायी शेतीसाठी एकात्मिक शेती पद्धतीचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या कार्यशाळेस परिसरातील ४२ शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## नविन भाटवडगाव येथील प्रणव राठोड यांचे एमबीबीएसमध्ये घवघवीत यश

माजलगाव /प्रतिनिधी

बी. टी. पवार नगरीसाठी अभिमानास्पद ठरणारी बाब म्हणजे येथील चिरंजीव प्रणव सखाराम राठोड यांनी एमबीबीएस (चइइड) पदवी संपादन करून उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रणव हे सखाराम गोविंद राठोड व अनिता बाबुराव पवार यांचे सुपुत्र असून, स्वर्गीय श्री बी. टी. पवार यांचे नातू आहेत.



त्यांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे कुटुंबासह संपूर्ण परिसराची मान उंचावली आहे.या यशाबद्दल आयोजित अभिनंदन कार्यक्रमास सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक माणिक हेमा राठोड, चंद्रकांतजी परदेशी, गोपाळजी राठोड (पावरा गड), सुरेश चव्हाण आणि सुहास बाबुराव पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी प्रणव यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी मान्यवरांनी सांगितले की, प्रणव यांनी मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या पुढील वैद्यकीय सेवेसाठी उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा व्यक्त केल्या. प्रणव राठोड यांचे हे यश बी. टी. पवार नगरीसाठी गौरवास्पद असून त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

## काँग्रेस भवनात उमेश राजेनिंबाळकर यांचा भव्य पदग्रहण सोहळ्यात संघटन बळकटीचा निर्धार




धाराशिव प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर उमेश राजेनिंबाळकर यांचा पदग्रहण सोहळा धाराशिव शहरातील काँग्रेस भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. जिल्हाभरातील काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध आघाड्यांचे प्रतिनिधी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा दिमाखात संपन्न झाला.

पदग्रहण सोहळयावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नानासाहेब पाटील, माधव कुतवळ, प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार, विश्वास शिंदे, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, प्रदेश सचिव डॉ. नवगिरे, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव अभिजित चव्हाण, शिला उंबरे, प्रदेश सचिव डॉ. स्मिता शहापूरकर, पांडुरंग कुंभार, राजाभाऊ शेरखाने, मधुकर बिद्री, प्रशांत पाटील, खलील सय्यद, नानाभाऊ भोसले, महेबूब पटेल, विनोद वीर, विलास शाळु, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा गोदावरी केंद्रे, अर्जुन बिराजदार, सर्फराज काजी, धनंजय राऊत, अग्निवेश शिंदे, शिवाजी गायकवाड, विजय वाघमारे, तोडकर, अशोक बनसोडे, गपाट, रुपेश शेंडगे, अमोल कुतवळ, बापू हरकर, सत्तार शेख, नगरसेवक अझर पठाण, बापू शेळके, ड. गणपती कांबळे, आयुब पठाण, अभिमान पेठे, अंकुश पेठे, मुहिब शेख, मौलाना शौकत, लक्ष्मीकांत खटके, बालाजी हूबाळे, नगरसेवक इम्रान शेख, राजुदास आडे, दत्ता तांबे, संकेत पडवळ, गणेश पवार, भूषण देशमुख, अभिषेक बागल, मोईज शेख, मोईज सय्यद, विजय दळगडे, आबेदिन कुरेशी, धीरज सोनवणे, जावेद काझी, जीवन चौगुले, दिगंबर गायकवाड, गहिनीनाथ सोनटक्के, चंद्रकांत जाधव, ड. सिराज मोगल, ड. मुशरफ सय्यद, समी काझी यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## पाटोद्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा निषेध

### कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने जी.आर.ची होळी

पाटोदा । प्रतिनिधी

राज्य शासनाने जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही केवळ दिशाभूल करणारी आणि शेतकऱ्यांची थट्टा करणारी असल्याचा आरोप करत, गुरुवारी पाटोदा येथे भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि किसान सभेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर शासनाच्या या कर्जमुक्ती योजनेच्या जी.आर.ची (शासन निर्णयाची) होळी करून संतप्त शेतकऱ्यांनी आपला निषेध व्यक्त केला.



**शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचा आरोप**

निवडणुकीच्या काळात राज्य सरकारने शेतकऱ्यांना 'सातबारा कोरा' करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात जाहीर केलेली कर्जमाफी योजना अत्यंत मर्यादित आणि जाचक अटींनी भरलेली आहे. या योजनेमुळे राज्यातील लाखो शेतकरी लाभापासून वंचित राहणार असून, ही योजना म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी म्हटले आहे.

**घोषणांनी दणाणला परिसर**

आंदोलनादरम्यान, उपविभागीय अधिकारी कार्यालय परिसरात फडणवीस सरकार मुर्दाबाद, शेतकरी विरोधी सरकार हाय हाय, शेतकरी एकजूट जिंदाबाद आणि संपूर्ण कर्जमाफी झालीच पाहिजे अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. या घोषणाबाजीमुळे संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

**प्रमुख मागण्या आणि इशारा**

किसान सभेचे उपाध्यक्ष कॉ. महादेव नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. यावेळी खालील मागण्या करण्यात आल्या:

कर्जमाफी योजनेतील जाचक अटी तातडीने रद्द कराव्यात.

सर्व पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळावा.

शेतकऱ्यांना तात्काळ 'संपूर्ण कर्जमाफी' देण्यात यावी.

आंदोलनानंतर मुख्यमंत्री, कृषिमंत्री आणि जिल्हाधिकारी यांना उद्देशून एक निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आले. शासनाने जर त्वरित शेतकऱ्यांच्या हिताचे ठोस निर्णय घेतले नाहीत, तर भविष्यात यापेक्षाही तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा कॉ. महादेव नागरगोजे यांनी दिला.

यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि किसान सभेचे पदाधिकारी, शेतकरी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# बीड जिल्ह्याच्या विकासात योगदान देण्यासाठी मला संधी द्या : बसवराज पाटील





बीड प्रतिनिधी

बीड-धाराशिव-लातूर स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीला आपण सामोरे जात आहोत. या मतदारसंघातील महत्त्वाचा जिल्हा असलेल्या बीडच्या विकासात योगदान देण्यासाठी प्रतिनिधित्व करण्याची संधी द्यावी, असे आवाहन बीड-धाराशिव-लातूर स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीतील भाजप व महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज पाटील यांनी केले.

बीडमध्ये भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पुढाकारातून गुरुवारी (दि.११) संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर आमदार सुरेश धस, आमदार अभिमन्यू पवार, भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे यांच्यासह बीड नगरपरिषदेतील भाजपचे नगरसेवक उपस्थित होते.

पुढे बोलताना बसवराज पाटील म्हणाले, बीड-धाराशिव-लातूर स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीतील भाजप व महायुतीचा उमेदवार म्हणून मी प्रचारासाठी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहे. आमदार सुरेश धस यांनी याच मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या माध्यमातून मतदारसंघात चांगले काम झाले. माझे आणि क्षीरसागर कुटुंबीयांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. डॉ.योगेश क्षीरसागर यांचे आजोबा स्व. सोनाजीराव नाना क्षीरसागर यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्यासमवेत उपस्थित राहण्याची संधी मिळाली होती. तेव्हापासून क्षीरसागर कुटुंबीयांशी माझा ऋणानुबंध कायम आहे. लोकनेत्या स्व. केशरकाकू क्षीरसागर यांचे मार्गदर्शन आणि माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे सहकार्य लाभले. आता डॉ.योगेश क्षीरसागर हे आमच्यासोबत आहेत. त्यांनी या निवडणुकीत मला सहकार्य करावे. मला संधी मिळाल्यास बीड जिल्ह्याच्या विकासात माझाही खारीचा वाटा राहील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यामुळे ही संधी मिळाली, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. यावेळी नगरसेवक शुभम धूत, सावित्रीताई नितीन साखरे, मीनाताई जाधव, मीनाताई रणजितसिंह चव्हाण, भाग्यश्री सागर देशपांडे, जगदीश गुरखुदे, राहुल गुरखुदे, मंगेश धोंगडे, भाग्यश्री तांबारे, पूजा राजाभाऊ गुजर, समीक्षा शेटे, सय्यद मुस्तफा, आदित्य माने, ज्योतीताई नंदकिशोर पिंगळे, गोविंद शिराळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### बसवराज पाटील यांचा विजय निश्चित-डॉ.योगेश क्षीरसागर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री पंकजाताई मुंडे आणि डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या माध्यमातून बीड शहराचा व मतदारसंघाचा विकास होत आहे. पंकजाताईंच्या नेतृत्वाखाली बीडमधील भाजप अधिक सक्षम होत आहे. या निवडणुकीत ५२ पैकी १६ नगरसेवक भाजपचे आहेत. आमची संपूर्ण ताकद बसवराज पाटील यांच्या पाठीशी उभी राहणार आहे. मतांची आकडेवारी पाहता त्यांचा विजय निश्चित असल्याचे चित्र आहे. त्यांनी आमदार झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांतील सर्व सदस्यांना ठराविक स्वनिधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

### बसवराज पाटील रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी होतील-आ.अभिमन्यू पवार

महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील हे रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी होतील. डॉ.योगेश क्षीरसागर यांची विधानसभेतील संधी अल्प मतांनी हुकली. मात्र बसवराज पाटील यांच्या पाठोपाठ डॉ. योगेश क्षीरसागर यांनाही पुन्हा संधी मिळेल. त्यांची ताकद बसवराज पाटील यांच्या पाठीशी असल्याने या निवडणुकीत मोठे यश मिळेल, असा विश्वास आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केला.

### निवडणुकीत भाजपसह मित्रपक्षांचेही सहकार्य लाभणार आहे-आ.सुरेश धस

भाजपचा मूळचा एखादा-दुसरा नगरसेवक असायचा. मात्र आता भाजपचे १६ नगरसेवक आहेत. यापूर्वी डॉ. भारतभूषण क्षीरसागर आणि नगरपरिषद हे समीकरण अनेक वर्षे कायम राहिले. त्यांना 'अध्यक्षसाहेब' म्हणून ओळखले जात होते. माझ्या यापूर्वीच्या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री पंकजाताई मुंडे यांनी संधी दिली आणि माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर तसेच डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यामुळे मी विजयी झालो आणि आज ही जागा भाजपच्या वाट्याला आली. या निवडणुकीतही भाजपसह मित्रपक्षांचे सहकार्य मिळणार आहे. त्यामुळे बसवराज पाटील मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.

---

## भेंडटाकळी येथे शेतकरी रामप्रसाद त्रिंबकराव उबाळे याची कर्जाला कंटाळून आत्महत्या

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील भेंडटाकळी येथील शेतकरी रामप्रसाद त्रिंबकराव उबाळे वय वर्ष ५२ या शेतकऱ्यानी भेडटाकळी येथील राहत्या घरी पायरीवर उभे राहुन वरील गजाला दोरी बांधून फाशी घेतल्याची घटना घडली आहे



सविस्तर असे की मयत शेतकरी शेतातुन घरी आला व नापीकि कर्जबाजारी पनाल कंटाळून भेडटाकळी ता गेवराई येथील सतत हसत मुख समजदार शेतकरी रामप्रसाद त्रिंबकराव उबाळे वय वर्षे ५२ यांनी दि ९/६/२०२६ रोजी दुपारी ३. वा फाशी घेऊन जिवन संपवले आहे यांच्या पाश्चात पत्नी दोन मुले सुन नातवडे आहेत रामप्रसाद उबाळे यांच्या या निर्णयामुळे

## तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजमध्ये नेत्र तपासणी व नेत्रदान शिबिर संपन्न

### ५९ विद्यार्थिनींची तपासणी, ४० विद्यार्थिनींनी भरले नेत्रदान प्रतिज्ञापत्र




बीड /प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक नेत्रदान दिनानिमित्त बुधवार, दि.१० जून रोजी मोफत नेत्र तपासणी व नेत्रदान प्रतिज्ञा नोंदणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. जिल्हा रुग्णालय, बीड यांच्या सहकार्याने झालेल्या या शिबिरात ५९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपली नेत्र तपासणी करून घेतली.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुण्या व तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून जिल्हा रुग्णालयाच्या नेत्ररोग अधिकारी श्रीमती सुप्रिया गोपाळघरे-मोराळे आणि जिल्हा रुग्णालयाच्या नेत्रदान समुपदेशक श्रीमती सी. एस. गुरव तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे उपस्थित होत्या.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना तज्ज्ञांनी सांगितले की, आपले डोळे मृत्यूनंतरही इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करू शकतात. एका व्यक्तीचे नेत्रदान दोन अंध बांधवांना नवी दृष्टी देऊ शकते. त्यामुळे समाजात नेत्रदानाविषयी असलेले सर्व गैरसमज दूर करून जास्तीत जास्त नागरिकांनी या राष्ट्रीय कार्यात पुढे येणे गरजेचे आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून प्रेरणा घेत यावेळी ४० विद्यार्थिनींनी मृत्यूनंतर नेत्रदानाचा संकल्प करत आपले अधिकृत प्रतिज्ञापत्रही भरून दिले.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्या सौ. सय्यद शहाना, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. श्वेता वंजारे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गीतांजली कांबळे यांनी केले, तर आभार प्रा. विद्या अवघडे यांनी मानले.

### दैनिक 'समर्थ राजयोग'चे संपादक वैभवजी स्वामी यांना

## वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव ;विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती



बीड/प्रतिनिधी

दैनिक 'समर्थ राजयोग' आणि साप्ताहिक 'शिववाणी'चे संस्थापक संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे प्रदेश संपर्कप्रमुख आदरणीय वैभवजी स्वामी साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीड येथे विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांची भेट घेऊन त्यांना दीर्घायुष्या च्या आणि यशस्वी वाटचालीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या लेखणीच्या व कार्याच्या माध्यमातून त्यांनी निर्माण केलेला वेगळा ठसा या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाला.

या सदिच्छा भेटीदरम्यान काँग्रेस पक्षाचे बीड शहराध्यक्ष तथा ख्यातनाम उद्योजक परवेज भाई कुरेशी, 'लेक लाडकी' अभियानाचे बाजीराव ढाकणे, ज्येष्ठ पत्रकार किशोर देवा कुलकर्णी, 'जनशक्ती महाराष्ट्र न्यूज चॅनल'च्या संपादिका ज्योती तुसांबड आणि सनी तुसांबड आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वैभवजी स्वामी साहेब यांचा सत्कार करण्यात आला.स्वामी साहेबांनी पत्रकारितेच्या माध्यमातून नेहमीच सर्व सामान्यांचे प्रश्न प्रशासनासमोर मांडले आहेत.तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे,अशा भावना यावेळी परवेज भाई कुरेशी व इतर मान्यवरांनी व्यक्त केल्या.

वाढदिवसाचे औचित्य साधून दिवसभर बीड शहर व जिल्ह्यातील राजकीय,सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी स्वामी साहेब यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. या सर्व स्नेहाबद्दल आणि शुभेच्छांबद्दल वैभवजी स्वामी यांनी उपस्थितांचे व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

---

## डीएचओ साहेब आरोग्य सुविधांकडे लक्ष द्या



### चकलांबा आरोग्य उपचाराअभावी रुग्णांना ताटकळत बसावे लागते

बीड /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा हे गाव बीडपासून पश्चिमेस लांब असल्याने येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सुविधांकडे दुर्लक्ष झाले आहे. या आरोग्य केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी मनमानी वागत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

चकलांबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकाऱ्याची मंजूर पदे आहेत. मात्र वर्षभरापासून येथे कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी नाही. तर कर्मचाऱ्याची रिक्त पदे आहेत. या आरोग्य केंद्रात तात्पुरत्या डॉक्टर'ची नियुक्ती करण्यात आली आहे. गुरूवार दि.११ रोजी डॉक्टर अभावी रुग्णांना ताटकळत बसण्याची वेळ आली. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दखल घेऊन कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी नियुक्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे वाऱ्यावर असून या ठिकाणी पदाचा पदाचा अधिकृत वैद्यकीय अधिकारी नाही. कंत्राटी पद्धतीने असलेल्या सीएचओ रुग्ण तपासणी करत आहेत.चकलांबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील काही कर्मचारी ही कधीच वेळेवर येत नाहीत. पदाचे कायम वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे खालचे कर्मचारी उशिराने रुग्णालयात येतात. कर्मचारी उपस्थित नसल्यामुळे अनेक रुग्णांना उपचार अभावी ताटकळत बसावे लागते.



बीड: येथील रिपाइंच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात स्थानिक स्वराज्य संस्था लातूर-बीड-धाराशिव मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांचा सत्कार करतांना युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह आ.सुरेश धस, आ.अभिमन्यू पवार, भाजपाचे जिल्हाध्यक्ष देशमुख,राजू जोगदंड,किसन तांगडे, प्रभाकर चांदणे सह आदी.

## लिंगायत उद्योजकांचा १४ जून रोजी नाशिक येथे भव्य मेळावा

नाशिक /प्रतिनिधी

लिंगायत समाजातील उद्योजक, व्यावसायिक आणि नवउद्योजकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने लिंगायत एंटरप्रेन्युअर असोसिएशन (ङए-) यांच्या वतीने रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी नाशिक येथे भव्य उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत क्वालिटी इन रीजन्सी, नाशिक-पुणे महामार्ग, विजय ममता (फेम थिएटर) जवळ, नाशिक येथे होणार आहे. या कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रातील उद्योजकांना परस्पर परिचय, व्यवसायवृद्धीच्या संधी, नेटवर्किंग तसेच नवीन व्यावसायिक संकल्पनांची देवाणघेवाण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

कार्यक्रमासाठी पूर्वनोंदणी अनिवार्य असून विना-नोंदणी प्रवेश दिला जाणार नाही. प्रत्येक उद्योगातून एकाच प्रतिनिधीस उपस्थित राहण्याची विनंती आयोजकांनी केली आहे. तसेच सहभागी उद्योजकांनी आपली व्हिजिटिंग कार्ड्स सोबत आणावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.हा उपक्रम केवळ व्यवसाय, उद्योगवृद्धी आणि व्यावसायिक संबंध दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला असून लिंगायत समाजातील उद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ङए- कोअर टीमचे सदस्य अजिंक्य जितेंद्र हिंगमिरे यांनी केले आहे.

## योग दिनानिमित्त पाच दिवस मोफत ऑनलाइन योग वेबिनार मध्ये सहभागी व्हा - राधा तांबे

बीड प्रतिनिधी

दरवर्षी २१ जून रोजी जागतिक योग दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून योगाचे महत्त्व अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचावे आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजात रुजावा, या उद्देशाने योग शिक्षिका राधा तांबे यांच्यावतीने १५ जून ते २० जून या कालावधीत पाच दिवसांच्या मोफत ऑनलाइन योग वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात वाढता तणाव, बदलती जीवनशैली आणि विविध आरोग्य समस्या लक्षात घेता योगाची गरज अधिक महत्त्वाची ठरत आहे. या वेबिनारमध्ये योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे फायदे, दैनंदिन जीवनात योगाचा समावेश कसा करावा, तसेच प्राणायाम, ध्यान आणि विविध योगासनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ऑनलाइन स्वरूपात होणाऱ्या या वेबिनारमध्ये विद्यार्थी, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना घरबसल्या सहभागी होता येणार आहे. जागतिक योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, तसेच आपल्या कुटुंबीय आणि मित्रपरिवारालाही सहभागी करून घ्यावे, असे आवाहन राधा तांबे यांनी केले आहे. वेबिनारमध्ये सहभागी होण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ९७६५४१००४४ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅंक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार पण प्रशासन गप्पच अतिरिक्त पदभार प्रकरणात कारवाईचा फाईलनामा धूळखात

## परतूर पंचायत समितीतील त्या वादग्रस्त पदभाराची फाईल लालफितीत जालना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संशयास्पद भूमिकेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप

जालना /प्रतिनिधी :-

प्रशासकीय पारदर्शकता आणि नियमांच्या गप्पा मारणाऱ्या जालना जिल्हाधिकारी प्रशासनाचा ढिसाळ आणि संशयास्पद कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. पंचायत समिती परतूर येथील गट विकास अधिकारी वर्ग-१ पदाचा अतिरिक्त पदभार कृषी अधिकारी गट-ब आर. एल. तांगडे यांच्याकडे सोपवण्यातील गंभीर नियमभंग आणि अनियमितेबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे पुराव्यासह तक्रार दाखल करूनही महिना उलटत आला तरी कारवाईची फाईल धूळखात पडली आहे. त्यामुळे प्रशासन नेमके कोणाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहे ? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

नियम धाब्यावर बसवून मेहेरबानी ?

मिळालेल्या माहितीनुसार १८ जुलै २०२४ पासून परतूरचे बीडीओ वर्ग-१ पदाचा अतिरिक्त पदभार आर. एल. तांगडे कृषी अधिकारी गट-ब यांच्याकडे देण्यात आला आहे. वर्ग-१ च्या पदाचा पदभार वर्ग-२ च्या अधिकाऱ्याकडे सोपवताना सर्व नियम धाब्यावर बसवले गेल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रशासकीय मनमानीविरोधात आणि पदभार मंजुरीच्या संशयास्पद प्रक्रियेची चौकशी करण्यासाठी दि. २५ मे २०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जालना यांच्याकडे सविस्तर लेखी तक्रार दाखल करण्यात आली होती.

काय आहे तक्रारदाराचा सवाल?

तक्रार दाखल करून दिवस उलटले वारंवार पाठपुरावा केला तरी चौकशी कुठपर्यंत आली याचे साधे उत्तरही प्रशासन देत नाही. मग जिल्हाधिकारी कार्यालयात सामान्य जनतेने दिलेल्या तक्रारींचे नेमके होते तरी काय ? तक्रारींची होळी केली जाते की फाईल दडपली जाते ? असा जळजळीत सवाल तक्रारदाराने उपस्थित केला आहे.तक्रारीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष ? संशयाचे सावट दाटले

विशेष म्हणजे ही तक्रार केवळ किरकोळ स्वरूपाची नसून थेट शासन नियमांच्या अंमलबजावणीशी आणि शासकीय अधिकारांच्या गैरवापराशी संबंधित आहे. एवढे गंभीर प्रकरण समोर आले असतानाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून साधे चौकशीचे आदेश किंवा चौकशी अहवालही समोर आलेला नाही. जिल्हा प्रशासनाने या प्रकरणात घेतलेले मौन हे अनेक शंका-कुशंकांना जन्म देणारे ठरणार आहे.

प्रशासकीय निष्क्रियतेचा कळस; सामान्य जनतेने न्याय मागायचा कुणाकडे ?

जिल्ह्यातील सर्वोच्च प्रशासकीय पद असलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयातच जर भ्रष्टाचाराच्या किंवा अनियमिततेच्या तक्रारींची दखल घेतली जात नसेल तर सामान्य नागरिकांनी न्यायासाठी कुणाचे उंबरठे झिजवायचे ? असा गंभीर प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. संबंधित प्रकरणात आजपर्यंत कोणतीही ठोस प्रशासकीय कार्यवाही न झाल्याने या संपूर्ण फाईलनामा मागे काही राजकीय वरदहस्त किंवा प्रशासकीय साटंलोटं तर नाही ना ? अशी उलटसुलट चर्चा आता जिल्ह्यात रंगू लागली आहे.

आता या गंभीर प्रकरणात मा. जिल्हाधिकारी स्वतः लक्ष घालून तातडीने चौकशीचे आदेश देतात की ही फाईल अशीच लालफितीत अडकून ठेवतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# जालना संपर्क मंत्री आशिष जैस्वाल यांचा शिवसेना अल्पसंख्याक शहर आघाडीकडून भव्य सत्कार




जालना /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री तथा जालना जिल्ह्याचे संपर्क मंत्री आशिष जैस्वाल हे जालना दौऱ्यावर आले असता शिवसेना अल्पसंख्याक शहर आघाडीच्या वतीने त्यांचा उत्स्फूर्त व भव्य सत्कार करण्यात आला.

यावेळी संपर्क मंत्री आशिष जैस्वाल यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. जालना जिल्ह्याच्या विकासासाठी शासनस्तरावर विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी मंत्री महोदय प्रयत्नशील असल्याबद्दल शिवसेना पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

या प्रसंगी शिवसेना अल्पसंख्याक शहर जिल्हाध्यक्ष जफर खान, उपशहर प्रमुख शेख नजीर भाई, बिलाल सौदागर, शाखाप्रमुख परवेज खान, शेख खालिद, शेख सईद भाई, राजेक कुरेशी, जान मोहम्मद कुरेशी यांच्यासह अनेक शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपर्क मंत्री आशिष जैस्वाल यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधत जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून उपस्थितांनी मंत्री महोदयांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.शिवसेना अल्पसंख्याक शहर आघाडीच्या वतीने झालेल्या या भव्य सत्कारामुळे दौऱ्याला विशेष रंगत प्राप्त झाली.



# अंबडमध्ये सकल मातंग समाजाचा एल्गार तहसीलसमोर धरणे आंदोलन

## मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडणार -भारत जाधव

अंबड /प्रतिनिधी :-अनुसूचित जातीच्या अ,ब,क,ड उपवर्गीकरणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची राज्य सरकारकडून अद्याप अंमलबजावणी होत नसल्याच्या निषेधार्थ अंबड तालुक्यातील सकल मातंग समाजाने गुरुवारी दि.११ तहसील कार्यालयासमोर जोरदार धरणे आंदोलन छेडले. मातंग समाजाचे नेते शिवाजी घुले यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात महिला,युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत शासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी केली.

सकाळी ११ वाजल्यापासून सुरू झालेल्या या आंदोलनामुळे तहसील कार्यालय परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर अंबडमधील हे आंदोलन विशेष लक्षवेधी ठरले.मातंग समाजाला न्याय मिळालाच पाहिजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.यावेळी ज्येष्ठ नेते भारत जाधव यांनी शासनाला थेट इशारा देत सांगितले की मातंग समाजाच्या न्याय्य मागण्यांची तातडीने दखल घेतली नाही तर संपूर्ण महाराष्ट्रभर उग्र आणि व्यापक आंदोलन उभारले जाईल. समाजावर अन्याय सहन केला जाणार नाही.आंदोलनात सतीश सोनवणे, राजेंद्र सोनवणे,सुमंता शिंदे, राम पवळे, कुमार गुडेकर,भीवराज सकट,दानियल निर्मळ, शाळीग्राम हंगारगे,मंगल सोनवणे,वंदना गवळी,माया गवळी,राजू जाधव यांच्यासह तालुक्यातील असंख्य मातंग बांधव व महिला भगिनी उपस्थित होत्या.आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ ढाकणे,रामेश्वर मुळक तसेच पोलीस कर्मचाऱ्यांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील काळुंके यांनी केले. आंदोलनाच्या माध्यमातून मातंग समाजाने आपल्या हक्कांसाठी एकजूट दाखवत शासनाला स्पष्ट संदेश दिला असून मागण्या मान्य न झाल्यास आगामी काळात संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# शिक्षणमहर्षी माजी आ.भीमराव धोंडे साहेबांच्या दूरदृष्टीतून तंत्रशिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक झेप

## कडा व पाटोदा येथे दोन नवीन पॉलिटेक्निक महाविद्यालयांना मान्यता



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची संधी त्यांच्या परिसरातच उपलब्ध व्हावी, या उदात्त हेतूने सातत्याने कार्यरत असलेले शिक्षणमहर्षी माजी आ. भीमराव धोंडे साहेबांनी तंत्रशिक्षण क्षेत्रात आणखी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या शैक्षणिक संस्थांमार्फत कडा व पाटोदा येथे सुरू करण्यात आलेल्या दोन नवीन पॉलिटेक्निक महाविद्यालयांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (एआयसीटीई), नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (एमएसबीटीई), मुंबई यांची अधिकृत मान्यता प्राप्त झाली असून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे बीड जिल्ह्यासह आष्टी, पाटोदा, शिरूर कासार आणि परिसरातील हजारो विद्यार्थ्यांसाठी तंत्रशिक्षणाची नवी दालने खुली झाली आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या आनंद चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या विविध शाखा उपलब्ध करून देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. कृषी, फार्मसी, वैद्यकीय, अभियांत्रिकी, नर्सिंग, तंत्रनिकेतन, पॅरामेडिकल, कृषी पदविका, पशुसंवर्धन आदी अनेक अभ्यासक्रम यशस्वीपणे चालवित असताना आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षणाच्या दिशेनेही संस्थेने मोठी झेप घेतली आहे.

कडा येथील बाबाजी शैक्षणिक संकुलामध्ये गंगाई अँड रोबोटिक्स पॉलिटेक्निक कॉलेज तर पाटोदा येथील धोंडे शैक्षणिक संकुलामध्ये आनंदराव धोंडे पॉलिटेक्निक कॉलेज या दोन नवीन संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. या दोन्ही महाविद्यालयांना आवश्यक त्या सर्व शासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्या असून विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

कडा येथील महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग, ऑटोमोबाईल इंजिनिअरिंग तसेच रोबोटिक्स अँड ऑटोमेशन या आधुनिक आणि रोजगाराभिमुख शाखा सुरू करण्यात येणार आहेत. तर पाटोदा येथील महाविद्यालयात कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या शाखांना मान्यता प्राप्त झाली आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात देश-विदेशात मोठ्या प्रमाणावर मागणी असलेल्या या शाखांमुळे विद्यार्थ्यांना भविष्यात रोजगाराच्या व्यापक संधी उपलब्ध होणार आहेत. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणासाठी पुणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर किंवा इतर मोठ्या शहरांमध्ये जावे लागत होते. त्यामुळे पालकांवर आर्थिक ताण येत होता. विद्यार्थ्यांना राहण्याचा, प्रवासाचा व इतर खर्चाचा अतिरिक्त भार सहन करावा लागत होता. मात्र आता ही दोन्ही महाविद्यालये सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातच अत्याधुनिक तांत्रिक शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठ्या प्रमाणात बचत होणार असून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवी दिशा मिळणार आहे.

आजचे युग हे कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, ऑटोमेशन, संगणक विज्ञान आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे युग मानले जाते. उद्योग क्षेत्रात झपाट्याने होत असलेल्या बदलांचा विचार करून विद्यार्थ्यांना भविष्यातील रोजगारक्षम शिक्षण देण्याचा संकल्प या संस्थांनी केला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील जागतिक स्पर्धेत सक्षमपणे उतरू शकतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

शिक्षणमहर्षी माजी आ. भीमराव धोंडे साहेबांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक कारकिर्दीत शिक्षण क्षेत्राला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्थांमुळे हजारो युवक-युवतींना शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबी होण्याची संधी मिळाली आहे. कडा आणि पाटोदा येथे सुरू झालेली ही दोन नवीन पॉलिटेक्निक महाविद्यालये त्यांच्या दूरदृष्टीचे आणि शिक्षण क्षेत्रातील बांधिलकीचे आणखी एक ज्वलंत उदाहरण ठरत आहेत.

या नव्या महाविद्यालयांमुळे केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे तर संपूर्ण परिसराच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासालाही चालना मिळणार आहे. तंत्रशिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील युवकांना नवे कौशल्य, नवे ज्ञान आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत केले जात आहे. बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक इतिहासात महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या निर्णयामुळे शिक्षणमहर्षी माजी आ. भीमराव धोंडे साहेबांच्या नावावर आणखी एका ऐतिहासिक कार्याची नोंद झाली असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याला नवी दिशा देणारा हा उपक्रम ठरणार आहे.

# भोकरदनमध्ये म्हाडा परिसरात भीषण आग; अग्निशामक दल गायब, प्रशासनाची २० किलो धान्याची' क्रूर थट्टा

## माजी आमदार चंद्रकांत दानवेंचा प्रशासनाला फोन बांधकाम कामगारांच्या ४ कुटुंबांचा संसार खाक रात्र रस्त्यावर काढण्याची पाळी

**भोकरदन इसरारखान पठाण :-**

**आग लागली फोन केले पण लागले नाहीत कार्यालयात गेलो तर तिथे कुत्रंही नव्हतं परिणामी डोळ्यांदेखत आमची घरं जळत राहिली आणि प्रशासन झोपा काढत होतं हा संतप्त आणि तितकाच आर्त आक्रोश आहे भोकरदनच्या म्हाडा परिसरातील पीडित अंधुरे कुटुंबाचा. एका भीषण आगीत चार गरीब कुटुंबांचा संपूर्ण संसार खाक झाला पण या आपत्तीत मदतीला धावून येणारे प्रशासन किती सुस्त आणि संवेदनशून्य आहे याचा अत्यंत धक्कादायकळ प्रकार समोर आला आहे. सर्वस्व गमावलेल्या या पीडितांना शासनाकडून मदत म्हणून मिळाली काय ? तर फक्त प्रत्येकी २० किलो धान्य एकूण ८० किलो धान्य देऊन प्रशासनाने आपली जबाबदारी झटकली असून लहान मुले-बाळं घेऊन ही कुटुंबे रात्रभर रस्त्यावर झोपायला मजबूर झाली.**

अग्निशामक दल की प्रशासनाचा पांढरा हत्ती ?



घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते चंद्रसिंग ढवळे यांनी तातडीने अग्निशामक दलाला फोन लावले.पण नेहमीप्रमाणे फोन लागलाच नाही. यंत्रणा जागी असेल या आशेने त्यांनी थेट अग्निशामक दलाच्या कार्यालयाकडे धाव घेतली.पण तिथे गेल्यावर जो धक्का बसला तो संताप आणणारा होता कार्यालयात एकही कर्मचारी उपस्थित नव्हता आपत्ती व्यवस्थापन नावाचा सरकारी फुगा इथे पूर्णपणे फुटला होता. अखेर स्थानिक नागरिकांनी जीवाची बाजी लावून पाणी मारत आग आटोक्यात आणली पण तोपर्यंत अंधुरे कुटुंबाच्या स्वप्नांची राख रांगोळी झाली होती.माजी आमदार चंद्रकांत दानवे कडाडले तहसीलदारांना थेट आदेश घटनेचे गांभीर्य ओळखून माजी आमदार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जळालेल्या घरांची पाहणी केली. पीडितांची अवस्था पाहून त्यांनी थेट तहसीलदारांना फोन लावून प्रशासनाचा ढिसाळपणा चव्हाट्यावर आणला.ही ४ कुटुंबे बांधकाम कामगार आहेत, त्यांचे सर्वस्व गमावले आहे. शासनाकडून लागेल ती सर्व मदत तातडीने द्या आणि त्यांच्या निवाऱ्याची तात्पुरती व्यवस्था करा अशा कडक आणि आक्रमक सूचना दानवे यांनी तहसीलदारांना दिल्या.

तसेच जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनीही पीडित कुटुंबांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि प्रशासनाकडून तातडीने आर्थिक व पुनर्वसनाची मदत मिळवून देण्यासाठी तीव्र पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

आम्ही लोकांची घरं बांधतो पण आमच्याच डोक्यावर छप्पर नाही या आगीत रुपचंद नारायण अंधुरे,संजय रुपचंद अंधुरे,राजू रुपचंद अंधुरे आणि गजानन रुपचंद अंधुरे या ४ भावांचे संसार पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहेत. हे सर्वजण मूळचे बांधकाम कामगार आहेत. दिवसभर लोकांची घरे बांधणाऱ्या या मजुरांच्या नशिबाची क्रूर थट्टा बघा शासनाच्या कोणत्याही कामगार योजनेचा लाभ त्यांना आजवर मिळालेला नाही. घरकुलासाठी फाईल भरून वर्षे उलटली पण ती फाईल अजूनही सरकारी कार्यालयाच्या लाल फितीत पेंडिंग आहे

८० किलो धान्याने पेटलेली पोटं विझणार का ? जनता विचारतेय सवाल सोनवणे तलाठी यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा तर केला पण नेहमीप्रमाणे ठोस काहीच दिले नाही. नायब तहसीलदार अविनाश पाटील यांनीही पाहणीचे सोपस्कार पार पाडत प्रत्येक कुटुंबाला २० किलो प्रमाणे एकूण ८० किलो अन्नधान्य टेकवले. पण प्रश्न हा पडतो की ज्यांच्या डोक्यावर छप्पर नाही घरात भांडी नाहीत ते हे धान्य शिजवणार कुठे आणि खाणार कसे ? माजी आमदारांनी आदेश देऊनही प्रशासनाने या पीडितांच्या निवाऱ्याची कोणतीही व्यवस्था केली नाही.

जनतेचे प्रशासनाला धारदार सवाल अग्निशामक दलाचा फोन लागत नाही कर्मचारी जागेवर नसतात मग आपत्तीच्या वेळी नागरिकांनी काय मरावं का ? अशा बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई कधी होणार ?

माजी आमदारांनी आदेश दिल्यानंतरही प्रशासनाने तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था का केली नाही ? लहान मुले रस्त्यावर झोपायला प्रशासन जबाबदार नाही का ?

बांधकाम कामगार असूनही कोणतीही योजना नाही घरकुलाची फाईल धूळ खात पडून आहे मग शासनाच्या या योजना आहेत तरी कुणासाठी ? फक्त कागदावर मिरवण्यासाठी का ? सर्वस्व गमावून रस्त्यावर आलेल्या या गरीब कामगारांना आता तात्काळ घरकुल मंजूर करून देणे आणि त्यांच्या हक्काच्या पुनर्वसनाची व्यवस्था करणे हीच प्रशासनाची खरी परीक्षा असेल अन्यथा जनतेचा हा संताप रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही

# कै.तुळसाबाई रावसाहेब जंजिरे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भावपूर्ण अभिवादन

ह.भ.प. शालिनीताई महाराज इंदोरीकर यांच्या कीर्तनसेवेचे आयोजन



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) प्रेमळ स्वभाव, कुटुंबवत्सल वृत्ती, धार्मिक आस्था आणि समाजातील प्रत्येकाशी जिव्हाळ्याचे संबंध जपणाऱ्या कै. तुळसाबाई रावसाहेब जंजिरे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त शुक्रवार दि. १२ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने जंजिरे परिवारातर्फे त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात येणार असून परिसरातील भाविक, नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कै. तुळसाबाई जंजिरे यांनी आपल्या आयुष्यात कुटुंबाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. साधेपणा, माणुसकी, प्रेम, सहकार्याची भावना आणि धार्मिक संस्कार यांमुळे त्यांनी समाजात एक वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनानंतरही त्यांच्या कार्याची, विचारांची आणि प्रेमळ सहवासाची आठवण कुटुंबीयांसह अनेकांच्या मनात कायम जिवंत आहे. सहवास जरी सुटला, स्मृती सुगंध देत राहील, आयुष्याच्या प्रत्येक वळणावर, आठवण तुमची येत राहील या भावनांमधून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात येत आहे.

प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रमानिमित्त ह.भ.प. शालिनीताई महाराज इंदोरीकर यांचे सुश्राव्य कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्यांच्या कीर्तनातून अध्यात्म, संस्कार, भक्ती आणि जीवनमूल्यांचा संदेश भाविकांना मिळणार आहे. या कीर्तनसेवेचा लाभ घेण्यासाठी परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा कार्यक्रम नगर-जामखेड रोडवरील गोविंद मंगल कार्यालय, बाळेवाडी फाटा, ता. आष्टी, जि. बीड येथे संपन्न होणार आहे. पुण्यस्मरणाच्या निमित्ताने दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करताना धार्मिक वातावरणात स्मरण, प्रार्थना आणि कीर्तनाचा कार्यक्रम होणार असल्याने भाविकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

कै. तुळसाबाई रावसाहेब जंजिरे यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात, त्यांच्या आदर्शांचा वारसा पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहावा आणि त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी, हीच भावना व्यक्त करत समस्त जंजिरे परिवाराने सर्व हितचिंतक, नातेवाईक व नागरिकांना या पुण्यस्मरण कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे नम्र आवाहन केले आहे.

# प्रथम पसंतीचे मतदान देऊन बसवराज पाटील यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करा-आ.सुरेश धस

## आष्टीतील महायुतीच्या संवाद बैठकीत एकजुटीचे प्रदर्शन;बसवराज पाटील यांच्या विजयाचा निर्धार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) लातूर-बीड-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज माधवराव पाटील यांच्या प्रचारार्थ आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या संवाद बैठकीत महायुतीच्या पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांनी एकजुटीचे प्रभावी दर्शन घडविले. आष्टी येथील अद्वैतचंद्र निवास येथे झालेल्या या बैठकीत आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी उपस्थितांना संबोधित करत बसवराज पाटील यांना प्रथम पसंतीचे मतदान देऊन विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की, राजकारण हे केवळ पक्षीय सीमा, मतभेद किंवा निवडणुकांपुरते मर्यादित नसून ते जनतेच्या विकासाशी आणि समाजाच्या प्रगतीशी जोडलेले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विधान परिषदेत अभ्यासू, अनुभवी आणि विकासाभिमुख नेतृत्व पोहोचणे आवश्यक आहे. विकासाच्या प्रश्नांवर सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असून वैयक्तिक मतभेद, राजकीय हेवेदावे आणि पक्षीय भिंती बाजूला ठेवून जनहिताला प्राधान्य दिले पाहिजे.

बसवराज पाटील यांच्यासारखे संयमी, दूरदृष्टी असलेले आणि जनतेच्या प्रश्नांबाबत संवेदनशील नेतृत्व विधान परिषदेत गेले तर मराठवाड्याच्या विकासाला निश्चितच नवी गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, बसवराज पाटील यांचा राजकीय प्रवास हा संघर्ष, सातत्य आणि जनसंपर्काचा आदर्श नमुना आहे. सन १९९९ पासून त्यांनी राजकारणात अखंडपणे कार्य करत जनतेचा विश्वास संपादन केला आहे. त्यांची सर्वसमावेशक कार्यपद्धती, नम्र स्वभाव आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती ही त्यांची मोठी ताकद आहे. त्यामुळेच विविध पक्षांतील अनेक लोकप्रतिनिधीही त्यांना पाठिंबा देत आहेत. विधान परिषदेत त्यांची निवड झाल्यास लातूर, बीड आणि धाराशिव या तीनही जिल्ह्यांच्या प्रश्नांना सक्षम व प्रभावी आवाज मिळेल, असेही त्यांनी सांगितले.



महायुतीचे उमेदवार बसवराज माधवराव पाटील यांनी आपल्या भाषणात आ. सुरेश धस यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले की, लातूर-बीड-धाराशिव हा मतदारसंघ महाराष्ट्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघाने सुरेश धस यांच्यासारखा धडाडीचा, अभ्यासू आणि विकासाभिमुख नेता राज्याला दिला आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे आष्टी मतदारसंघाने राज्याच्या राजकारणात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

जनतेसाठी कसे झटावे, प्रशासनाकडून विकासकामे कशी मार्गी लावावीत आणि लोकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष कसा करावा, हे मी सुरेश धस यांच्याकडून शिकलो आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. माझा आणि धस साहेबांचा चार दशकांहून अधिक काळाचा राजकीय सहवास आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सर्वप्रथम मी धस साहेबांशी संवाद साधला. त्यांनी ज्या विश्वासाने आणि ताकदीने माझ्या पाठीशी उभे राहत साथ दिली, तो माझ्यासाठी मोठा आधार आहे. यापुढे मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मी पूर्ण ताकदीने काम करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधींनी पक्षीय सीमा ओलांडून आ. सुरेश धस यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. महायुती सरकारच्या विकासाभिमुख धोरणांचे स्वागत करत बसवराज पाटील यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार करण्यात आला. मराठवाड्याच्या विकासाला गती देण्यासाठी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि वरिष्ठ सभागृहात प्रभावी प्रतिनिधित्व निर्माण करण्यासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची असल्याचे मत अनेक वक्त्यांनी व्यक्त केले.

या संवाद बैठकीस आ. अभिमन्यू भैय्या पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, वाल्मीक तात्या निकाळजे, गणेश शिंदे, माऊली जरांगे, विठ्ठल बदुले, रामराव गिते, रंगनाथ धोंडे, रोहीदास भाऊ गाडेकर, गणेश नारायणकर, प्रतिभा गाडेकर, दिपाली जाधव, जिया बेग, रमेश गावडे, अनिल ढोबळे, सुरेश उगलमुगले, भागवत येवले, अरुण भैय्या निकाळजे, अरुण भालेराव, यशवंत खंडागळे, रामदेव बद्दर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, कार्यकर्ते आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत दिसून आलेली एकजूट, लोकप्रतिनिधींचा उत्साह आणि विकासाच्या मुद्यांवर झालेली चर्चा यामुळे महायुतीचे उमेदवार बसवराज माधवराव पाटील यांच्या विजयासाठी आष्टी मतदारसंघातून भक्कम वातावरण तयार झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. मराठवाड्याच्या विकासासाठी सक्षम नेतृत्व विधान परिषदेत पाठविण्याचा निर्धार या बैठकीतून स्पष्टपणे व्यक्त झाला.

# बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ.शिवाजी राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

जिल्हाभर उत्साहाचे वातावरण

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजितदादा पवार गट) चे ज्येष्ठ नेते डॉ. शिवाजी राऊत यांचा गुरुवार, दि. ११ जून २०२६ रोजी वाढदिवस जिल्हाभर मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक तसेच वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि नागरिकांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून तसेच विविध माध्यमांतून शुभेच्छा देत त्यांच्या दीर्घायुष्याची आणि उत्तम आरोग्याची कामना केली.

बीड जिल्ह्याच्या राजकारणात आपल्या अभ्यासू, संयमी आणि विकासाभिमुख नेतृत्वामुळे स्वतंत्र ओळख निर्माण करणारे डॉ. शिवाजी राऊत हे जिल्ह्यातील एक प्रभावी आणि लोकप्रिय नेते म्हणून ओळखले जातात. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या कार्यकाळात त्यांनी ग्रामीण भागातील विकासकामांना प्राधान्य देत रस्ते,



पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि विविध मूलभूत सुविधांसाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासात्मक उपक्रमांना गती मिळाली आणि ग्रामीण भागातील जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाशी दीर्घकाळ निष्ठावंत राहून त्यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले आहेत. पक्षाच्या विचारधारेचा प्रचार आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. बीड जिल्ह्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक प्रश्नांवर ते नेहमीच आपली ठाम भूमिका मांडत असतात. समाजहिताच्या अनेक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असून, सर्वसामान्य नागरिकांशी त्यांचे असलेले जिव्हाळ्याचे नाते हे त्यांच्या लोकप्रियतेचे प्रमुख कारण मानले जाते.

वाढदिवसानिमित्त सकाळपासूनच त्यांच्या निवासस्थानी आणि कार्यालयात शुभेच्छुकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पुष्पगुच्छ, शाल-श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार केला. अनेक कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपण, गरजूंना अन्नधान्य वाटप, रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर यांसारखे उपक्रम आयोजित करून वाढदिवस साजरा केला.

सोशल मीडियावरही डॉ. शिवाजी राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव झाला. व्हॉट्सप, फेसबुक, इंस्टाग्राम, एक्स (ट्विटर) यांसह विविध डिजिटल माध्यमांवर हजारो कार्यकर्ते, मित्रपरिवार, समर्थक आणि नागरिकांनी शुभेच्छा संदेश प्रसारित केले. अनेकांनी त्यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याचा गौरव करत विशेष पोस्ट, बॅनर आणि व्हिडिओ संदेश शेअर केले. तसेच दूरध्वनी, संदेश आणि इतर माध्यमांतून राज्यातील तसेच जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

सामाजिक जाणीव, विकासाची दृष्टी, जनसंपर्काची ताकद आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांबाबत असलेली संवेदनशीलता यामुळे डॉ. शिवाजी राऊत यांनी बीड जिल्ह्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व स्तरातून व्यक्त झालेल्या शुभेच्छा आणि सदिच्छा या त्यांच्या कार्यावरील जनतेच्या प्रेमाची आणि विश्वासाचीच पावती असल्याची भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली.

डॉ. शिवाजी राऊत यांच्या आगामी आयुष्यास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेच्या कार्यात अधिक यश लाभो, अशा शुभेच्छा सर्व स्तरातून व्यक्त करण्यात आल्या.

# महाकाळा येथे खरीप हंगाम पूर्व नियोजन सभेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

घुंगर्डे हादगाव प्रतिनिधी :- खरीप हंगाम २०२६ यशस्वी करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान व विविध शासकीय योजनांची माहिती देण्याच्या उद्देशाने मौजे महाकाळा ता.अंबड जि. जालना येथे गुरुवारी दि.११ जून खरीप हंगाम पूर्व नियोजन सभेचे आयोजन करण्यात आले. कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब गंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.सभेच्या प्रारंभी सहाय्यक कृषी अधिकारी अशोक सव्वाशे यांनी खरीप हंगामातील विविध तांत्रिक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले.बीबीएफ पद्धतीची लागवड बीज प्रक्रिया एल निनोच्या संभाव्य परिणामांचा शेतीवर होणारा प्रभाव दर्जेदार बियाण्यांची निवड तसेच गो-कृपा अमृतम तयार करण्याची पद्धत याबाबत त्यांनी शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती दिली. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर योग्य नियोजन करून शेती व्यवस्थापन करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यानंतर सहाय्यक कृषी अधिकारी विजय जाधव यांनी कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याविषयी मार्गदर्शन केले.कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित महा विस्तार मोबाईल प्लिकेशनच्या विविध सुविधांची माहिती देत उपस्थित शेतकऱ्यांच्या मोबाईलमध्ये प्रत्यक्ष प डाउनलोड करून त्याच्या



वापराचे प्रात्यक्षिक सादर केले.कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे बी.टी.येवले हे प्रमुख उपस्थित होते.त्यांनी ट्रस्टमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध विकासात्मक उपक्रमांची माहिती देत ग्रामीण विकास आणि शाश्वत शेतीसाठी संस्थेच्या योगदानाचा आढावा मांडला.उप कृषी अधिकारी शुभांगी शिंदे यांनी महाडीबीटी पोर्टलवरील विविध कृषी योजना बियाणे मिनीकीट योजना कापूस प्रकल्पांतर्गत उपलब्ध बियाणे तसेच इतर शासकीय योजनांविषयी माहिती दिली. शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर अर्ज करून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा व शेती उत्पादनात वाढ करावी असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय सहाय्यक कृषी अधिकारी गोवर्धन उडे यांनी केले. शेवटी उपस्थित मान्यवर, शेतकरी व ग्रामस्थांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.या सभेस गावातील प्रतिष्ठित नागरिक दत्तात्रय कव्हळे,नारायण क्षीरसागर, राजकुमार चिमणे,दत्ता लहाने, दर्शन कव्हळे,नितीन शेळके, श्रीकांत ढोकळे,शरद कव्हळे, संभाजी लहाने,गणेश कव्हळे, चक्रधर पांचाळ,जगदीश फुलझळके,लिमकर मामा यांच्यासह परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कृषी विभागाने आयोजित केलेल्या या मार्गदर्शन सभेचे उपस्थित शेतकऱ्यांनी स्वागत करून समाधान व्यक्त केले.

# १६ जूनपासून दहावीची जून-जुलै २०२६ पुरवणी परीक्षा १८३ विद्यार्थी बसणार

## वेळेपूर्वी एक तास उपस्थित राहण्याचे केंद्र संचालक केशव अटकर यांचे आवाहन

घनसावंगी प्रतिनिधी :- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता १० वीच्या जून-जुलै २०२६ पुरवणी परीक्षेला दि.१६ जून २०२६ पासून सुरुवात होत असल्याची माहिती केंद्र संचालक तथा मुख्याध्यापक केशव अटकर यांनी लेखी निवेदनाद्वारे दिली आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत काही विषयांमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा आयोजित करण्यात आली असून एकूण १८३ विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले आहेत.घनसावंगी येथील कै. दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे परीक्षा केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. दि.१६ जून २०२६ मंगळवारपासून सुरू होणारी ही परीक्षा दररोज सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत पार पडणार आहे.

परीक्षेला बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान एक तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे तसेच हॉलतिकीट व



वैध ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य असल्याचे केंद्र संचालक केशव अटकर यांनी स्पष्ट केले आहे.याशिवाय परीक्षा पूर्णपणे कॉपीमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी पालक व विद्यार्थ्यांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. परीक्षा केंद्रावर आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून विद्यार्थ्यांनी कोणतीही भीती न बाळगता आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी असेही त्यांनी सांगितले.

दहावीच्या पुरवणी परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष वाया न घालवता यश मिळविण्याची आणखी एक संधी उपलब्ध झाली असून परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी केंद्र प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे.

# हज यात्रेचे पुण्यसंचय घेऊन मायदेशी परतले इंजि.अत्तहर बेग

## पत्रकार बांधवांकडून सत्कार करून शुभेच्छांचा वर्षाव

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी नगरपंचायतीचे कर्तव्यदक्ष अभियंता तथा सर्वांच्या परिचयातील मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व इंजि. अत्तहर बेग यांनी आपल्या पत्नींसमवेत इस्लाम धर्मातील सर्वात पवित्र आणि महत्त्वपूर्ण मानली जाणारी हज यात्रा अत्यंत श्रद्धा, भक्तिभाव आणि समर्पणाने पूर्ण केली. तब्बल ४६ दिवस मक्का आणि मदिना या पवित्र स्थळी वास्तव्यास राहून त्यांनी हज यात्रेतील सर्व धार्मिक विधी यशस्वीरित्या पार पाडले. ही पवित्र यात्रा पूर्ण करून मायदेशी परतल्यानंतर त्यांचा पत्रकार गणेश दळवी, पत्रकार सचिन रानडे आणि पत्रकार प्रविण पोकळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

हज यात्रा ही प्रत्येक मुस्लिम बांधवाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाची आणि आध्यात्मिकदृष्ट्या सर्वोच्च मानली जाणारी यात्रा आहे. अल्लाहप्रती निष्ठा, संयम, त्याग आणि समर्पणाची शिकवण देणाऱ्या या यात्रेदरम्यान जगभरातील लाखो मुस्लिम बांधव एकत्र येऊन प्रार्थना करतात. इंजि. अत्तहर बेग आणि त्यांच्या पत्नी यांनीही या पवित्र यात्रेदरम्यान विविध धार्मिक विधी पूर्ण करत देशाच्या प्रगतीसाठी, समाजाच्या कल्याणासाठी तसेच सर्व नागरिकांच्या सुख-शांती, आरोग्य आणि समृद्धीसाठी विशेष दुआ केली.

इंजि. अत्तहर बेग हे केवळ एक कुशल अभियंता नसून सामाजिक जाणीव जपणारे, सर्वसामान्यांच्या समस्या समजून घेणारे आणि विकासकामांबाबत सदैव तत्पर असणारे अधिकारी म्हणून परिचित आहेत. आष्टी नगरपंचायतीत कार्यरत असताना त्यांनी अनेक विकासकामांच्या अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्यपद्धतीत प्रामाणिकपणा, शिस्त आणि लोकाभिमुख



दृष्टिकोन दिसून येतो. त्यामुळे नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी विशेष आदरभाव निर्माण झाला आहे.

लोकनेते आ. सुरेश अण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपंचायतीच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांमध्ये त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय मानले जाते. शहराच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणारे अधिकारी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे आणि नम्र स्वभावामुळे त्यांना समाजातील विविध घटकांकडून सन्मान आणि प्रेम मिळत असते.

हज यात्रेसारखी पवित्र धार्मिक यात्रा पूर्ण केल्यानंतर व्यक्तीच्या जीवनात आध्यात्मिक परिवर्तन घडते, असे मानले जाते. या यात्रेमुळे इंजि. अत्तहर बेग यांच्या जीवनात अधिक सकारात्मकता, समाधान, मानसिक शांतता आणि आध्यात्मिक उन्नती लाभो, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. तसेच अल्लाह तआला यांनी त्यांच्या सर्व दुआ स्वीकाराव्यात, त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख-समृद्धी आणि यश प्रदान करावे, अशी प्रार्थनाही करण्यात आली.

समाजहिताची भावना जपत विकासकामे आणि लोकसेवा अधिक जोमाने करण्यासाठी त्यांना नवचैतन्य आणि प्रेरणा लाभो, तसेच भविष्यातही त्यांचे सामाजिक आणि प्रशासकीय योगदान अधिक वृद्धिंगत होवो, अशा सदिच्छा पत्रकार बांधवांसह मित्रपरिवार आणि नागरिकांनी व्यक्त केल्या. इंजि. अत्तहर बेग यांनी पूर्ण केलेली ही पवित्र हज यात्रा त्यांच्या जीवनातील एक अविस्मरणीय आणि प्रेरणादायी अध्याय ठरली असून, त्यांच्या या आध्यात्मिक प्रवासाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# निलंबित कृषी केंद्रांमध्ये खताची पोती; तात्काळ शेतकऱ्यांना वाटप करण्याची मागणी

नायगाव तालुक्यातील खरीप हंगामाच्या तोंडावर खतांची मागणी दिवसेंदिवस वाढत असताना, निलंबित करण्यात आलेल्या कृषी सेवा केंद्रांमध्ये सुमारे १५ हजार खतांची पोती पडून असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे ही खतसाठा तात्काळ शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याची मागणी शेतकरी संघटना व विविध स्तरातून जोर धरू लागली आहे.

कृषी विभागाने अनियमितता आढळून आल्याने तालुक्यातील काही कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित केले आहेत. मात्र या केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रासायनिक खतांचा साठा शिल्लक असल्याचे सांगितले जात आहे. खरीप हंगामासाठी शेतकरी बियाणे, खत आणि औषधांची जुळवाजुळव करण्यात व्यस्त असताना दुसरीकडे खतासाठी त्यांना भटकंती करावी लागत आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध असलेला खतसाठा उपयोगात आणणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक भागांत खतांचा तुटवडा जाणवत असून काही ठिकाणी आवश्यक त्या प्रमाणात खत उपलब्ध होत नाही. परिणामी पेरणीपूर्व तयारीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निलंबित केंद्रांमधील खतसाठा प्रशासनाने जप्त करून तो अधिकृत यंत्रणेमार्फत शेतकऱ्यांना वितरित केल्यास मोठा दिलासा मिळू शकतो.

दरम्यान, संबंधित कृषी सेवा केंद्रांमध्ये नेमका किती खतसाठा उपलब्ध आहे, त्याची गुणवत्ता व वितरणाबाबत कोणती प्रक्रिया राबविण्यात येणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. कृषी विभागाने या प्रकरणी तातडीने निर्णय घेऊन खताचा साठा वाया जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी पुढे येत आहे.

# वीज प्रश्नावर आ. भीमराव केराम यांचा महावितरण प्रशासनाला कडक इशारा

## खंडित वीज पुरवठ्याची समस्या न सुटल्यास पावसाळी अधिवेशनात प्रश्न गाजविणार



किनवट /प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यातील भोकर विभागातील किनवट उपविभागातील शहरी व ग्रामीण भागात होत असलेल्या खंडीत विज पुरवठ्याच्या पार्श्वभूमीवर आमदार भीमराव केराम यांनी किनवट येथे महावितरणच्या अधिकाऱ्यांशी दुरध्वनीवरुन संपर्क साधत प्रशासनाला कडक शब्दांत इशारा दिला. पावसाळा सुरु झालेला असताना वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबाची समस्या, रखडलेली दुरुस्ती कामे आणि देखभालीअभावी निर्माण होणाऱ्या अडचणी तातडीने दूर कराव्यात, अन्यथा आगामी पावसाळी अधिवेशनात हा प्रश्न जोरदारपणे उपस्थित करून महावितरण प्रशासनाला जाब विचारला जाईल, असा गर्भित इशारा त्यांनी दिला.

यावेळी ग्रामीण भागातील नागरिकांनी सतत खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबामुळे विद्युत उपकरणांचे होणारे नुकसान, जळालेले ट्रान्सफॉर्मर वेळेवर न बदलणे, नवीन वीज जोडण्या आणि दुरुस्ती कामांतील विलंब यासंदर्भातील तक्रार मांडल्या. आ. केराम यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रत्येक प्रकरणाची सविस्तर माहिती घेत नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याचे निर्देश दिले. पावसाळ्यात वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी धोकादायक विद्युत वाहिन्यांची दुरुस्ती, ट्रान्सफॉर्मरची नियमित देखभाल, झाडांच्या फांद्या मुळे होणारे व्यत्यय दूर करणे तसेच रखडलेली विकासकामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक वारंवार होणाऱ्या वीज खंडितत‌ेमुळे त्रस्त आहेत. पावसाळ्याच्या काळात ही समस्या अधिक गंभीर बनते. नागरिकांना अखंडित, सुरक्षित आणि दर्जेदार वीजपुरवठा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. प्रशासनाने वेळबद्ध कृती आराखडा तयार करून प्रत्येक तक्रारीचे निराकरण करावे, असे स्पष्ट निर्देश आ. केराम यांनी दिले. यावेळी त्यांनी महावितरण प्रशासनाला इशारा देताना सांगितले की, नांदेड जिल्ह्यासह भोकर विभाग आणि किनवट उपविभागातील वीज समस्यांबाबत अनेक तक्रारी सातत्याने प्राप्त होत आहेत. वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, अपुरी यंत्रणा आणि दुरुस्तीतील दिरंगाई यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. प्रशासनाने तत्काळ सुधारणा न केल्यास आगामी पावसाळी अधिवेशनात हा विषय प्रभावीपणे मांडून संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. दुरध्वनीवरुन बोलतांना महावितरणच्या अधिकाऱ्यांनी विविध प्रलंबित कामांचा आढावा सादर करत आवश्यक दुरुस्ती आणि देखभाल कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. मात्र नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा मिळाल्याशिवाय समाधान मानले जाणार नसल्याचे आ. भीमराव केराम यांनी स्पष्ट केले. किनवट, माहूर, गोकुंदा, बोधडी, शिवनी, इस्लापुर, मांडवी, सारखनी आणि परिसरातील ग्रामीण भागातील वीज व्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असून नागरिकांच्या प्रश्नांवर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी भूमिका आ. भीमराव केराम यांनी यावेळी माध्यमांशी बोलतांना सांगितले. त्यामुळे महावितरण प्रशासनानेही आता केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष कामांवर भर देण्याची गरज असल्याची चर्चा उपस्थितांमध्ये रंगली.

# मुदखेड-माळकोटा रोडवर कारचा भीषण अपघात

## सुदैवाने जीवितहानी टळली, दोघांना जबर मार

मुदखेड / प्रतिनिधी

मुदखेड-माळकोटा रोडवरील श्रीकृष्ण पेट्रोल पंपाजवळ आज पहाटेच्या सुमारास एका कारचा अत्यंत भीषण अपघात झाला. चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने कार रस्त्याच्या कडेला असलेल्या मुरमाच्या ढिगाऱ्याला आणि संकेतांक खांबाला धडकून पलटी झाली. या अपघातात कारमधील दोघे जण जबर जखमी झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

रात्रभराच्या प्रवासामुळे लागली डुलकी मिळालेल्या माहितीनुसार, अंबाजोगाई येथील चालक अजय नवघरे (वय २१ वर्ष) आणि करण विनायक जोगदंड हे दोघे कारने (भाड्याने) उमरी येथे प्रवाशांना सोडण्यासाठी गेले होते. उमरीवरून आपले काम आटपून ते कारने परत अंबाजोगाईकडे निघाले होते. मात्र, रात्रभर सतत प्रवास केल्यामुळे पहाटेच्या सुमारास चालकाला अचानक डुलकी लागली.

पहाटे सव्वा सहा वाजेच्या सुमारास मुदखेड-माळकोटा रोडवरील श्रीकृष्ण पेट्रोल पंपाच्या समोर आणि 'पंचकृष्ण हॉटेल'च्या बाजूला कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. भरधाव कार थेट रस्त्याशेजारील मुरमाच्या ढिगाऱ्यावर चढली आणि बाजूच्या खांबाला धडकून उलटली. अपघात इतका भीषण होता की गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.हा अपघात घडला त्याच वेळी व्यंकटी मुंगल हे तिथे उपस्थित होते. त्यांच्या डोळ्यांदेखत हा थरार घडला. त्यांनी कोणतीही वाट न पाहता तात्काळ गाडीकडे धाव घेतली.

त्यांच्या मदतीला पंचकृष्ण हॉटेलचे मालक , ठींराजेश मुंगल, प्रमोद मुंगल ग्रामसेवक साहेब शिवाजी मुंगल आणि इतर काही सहकारी धावून आले. या सर्वांनी मोठ्या शर्थीने कारमध्ये अडकलेल्या अजय नवघरे आणि करण जोगदंड या दोघांना सुखरूप बाहेर काढले.

येथील व्यंकटी मुंगल यांनी सामाजिक भान जपत जखमींना तात्काळ स्वतःच्या वाहनाने मुदखेड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून जखमींवर तातडीने उपचार सुरू केले. योग्य वेळी मदत आणि उपचार मिळाल्याबद्दल जखमींच्या नातेवाईकांनी आणि नागरिकांनी मुंगल कुटुंबीय तसेच मुदखेड येथील डॉक्टरांचे आभार मानले आहेत.

# मातोश्री शासकीय मुलांचे वसतीगृहात

## १५ ते ३० जूनदरम्यान प्रवेश सुरु

**नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- मातोश्री शासकीय ई.बी.सी. मुलांचे वसतीगृह, उच्च शिक्षण, तथागत नगर, मालेगाव रोड, नांदेड या वसतीगृहात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी नांदेड शहर परिसरातील माध्यमिक, उच्च माध्यमिक व पदवीसाठी शिक्षण घेत असलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार निवासाची व भोजनाची विनामुल्य सोय करण्यात येत आहे.**

प्रस्तुत वसतीगृहात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठीच्या पुर्न-प्रवेश / नूतन प्रवेशाबाबत याव्दारे अर्ज मागविण्यात येत आहेत. पुर्न- प्रवेश /नूतन प्रवेशाचे अर्ज वसतीगृहात कार्यालयीन वेळेत १५ ते ३० जून, २०२६ या कालावधीत (शासकीय सुट्टयांचे दिवस वगळून ) उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

सदर कालावधीत परिपुर्ण पुर्न-प्रवेश / नूतन प्रवेशाचे अर्ज हे संबंधित विहित कागदपत्रांसह स्विकारण्यात येईल. वरील निश्चित केलेल्या कालावधीनंतरचे आलेल्या अर्जाचा स्विकार केला जाणार नाही याची विद्यार्थी पालक तथा विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन गृहप्रमुख मातोश्री शासकीय इबीसी मुलांचे वसतीगृह नांदेड यांनी केले आहे.

# गोटपॉक्स लसीकरण : पहिल्या टप्प्यात ३७.५२ लाख लसमात्रांचे वाटप सुरु

## मोहीम गतिमान करण्याचे आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- राज्यातील गायवर्ग पशुधनाला लम्पी चर्मरोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षाकरिता आवश्यक असलेल्या गोटपॉक्स लसमात्रांचे उत्पादन 'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' येथे सुरू झाले आहे. २१ व्या पशुगणनेनुसार राज्यातील जिल्ह्यानिहाय गायवर्ग पशुधनाची संख्या विचारात घेऊन, पहिल्या टप्प्यात एकूण लस उत्पादनाच्या ४० टक्के म्हणजेच ३७ लाख ५२ हजार लसमात्रांचे वाटप नियोजनबद्ध रीतीने सुरू करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहीम युद्धपातळीवर व तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' या संस्थेने आवश्यक लसमात्रांचे उत्पादन यशस्वीपणे केले आहे. सर्व जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय यांनी पुरवण्यात आलेली लस क्षेत्रीय स्तरावर वेळेत पोहोचवताना तिची शीत साखळी कुठेही खंडित होणार नाही, याची काटेकोर दक्षता घ्यावी, गोटपॉक्स लसमात्रा प्राप्त होताच जिल्ह्यातील अधिक दूध देणाऱ्या व उच्च उत्पादनक्षमता असलेल्या पशुंचे प्राधान्याने लसीकरण करण्यात यावे, लसीकरणाच्या विहित नमुन्यातील बिनचूक आणि एकत्रित दैनंदिन अहवाल दररोज सकाळी ११ वाजेपर्यंत विभागनिहाय संस्थेकडे सादर करावा; अशा सूचना 'पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे' या संस्थेचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण यांनी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना केल्या आहेत.

हॉटस्पॉट तालुक्यांवर विशेष लक्ष

गतवर्षी ज्या तालुक्यांमध्ये लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून आला होता, त्या भागात प्राधान्य क्रमाने लसीकरण मोहीम राबवावी. या व्यापक मोहिमेसाठी जिल्ह्यातील सहकारी दुग्ध संघ, स्वयंसेवी संस्था तसेच खाजगी पशुवैद्यक व सेवादाते यांचे सक्रिय सहकार्य घेण्यात यावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हास्तरीय यंत्रणेला करण्यात आले आहे.

पशुधनाच्या सुरक्षिततेला प्राधान्य

लंपी चर्मरोगासारख्या (ङडऊ) संसर्गजन्य आजारांपासून आपल्या राज्यातील गोधनाची सुरक्षा करणे हे पशुसंवर्धन विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि आपल्या शेतकरी बांधवांचा मुख्य कणा आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी गोटपॉक्स लसीकरण हाच एकमेव आणि सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय आहे. सद्यस्थितीत हा उपाय क्षेत्रीय स्तरावर आम्ही मोहिम स्वरुपात योजत आहोत. पशुपालकांनीही विभागास सहकार्य करावे.

# राज्यात मान्सूनपुर्व रोगप्रतिबंधक लसीकरणाला मोहिम स्वरुपात प्रारंभ

## लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी पशुसंवर्धन विभागाचे काटेकोर नियोजन

नांदेड जिल्हा प्रतिनिधी : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली आहे. राज्यात 'मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम' आता युद्धपातळीवर व मोहीम स्वरूपात सुरू करण्यात आली आहे. राज्यातील पशुधनाचे आरोग्य राखणे व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे हे आपले मुख्य ध्येय असून, निश्चित केलेल्या लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या शंभर टक्के पूर्तीसाठी विभागाने काटेकोर नियोजन केले आहे, अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी दिली. या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

पावसाळ्यापूर्वी होणाऱ्या घटसर्प (क्रशोीिहरसळल डशिींळलशाळर) व फऱ्या (इश्रलज्ञ टींरींशी) यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी लसीची गुणवत्ता टिकून राहणे अत्यंत महत्त्वाचे असते. डॉ. किरण पाटील यांनी सांगितले की, लसीचा प्रभाव उत्तम राहण्यासाठी शीतसाखळी व्यवस्थापन अत्यंत चोख ठेवण्यात आले आहे. राज्यस्तरापासून ते थेट ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत लस पोहोचवताना आवश्यक तापमान राखले जाईल, यासाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर केला जात आहे.

मोहीम यशस्वी करण्यासाठी विभागामार्फत सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत जिल्हा व तालुका पातळीवर आवश्यकतेनुसार लसींचा पुरेसा साठा आधीच वितरित करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आली असून, ती प्रत्यक्ष गावागावांत व गोठ्यांपर्यंत पोहोचून 'डोअर स्टेप' पद्धतीने लस टोचणी करत आहेत. एकाही जनावराचे लसीकरण सुटणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पशुपालकांना आवाहन

पावसाळ्यात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व संसर्ग पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ऐनवेळी येणारे संकट आणि होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पशुपालकांनी आपल्या गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करून घ्यावे. यासाठी आपल्या जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

'भारत पशुधन प्रणाली'वर तात्काळ नोंदणी

यावेळच्या मोहिमेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लसीकरणाचे पारदर्शक डिजिटल ट्रॅकिंग होय. आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी सर्व पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना कडक सूचना दिल्या आहेत की, प्रत्येक पशुधनाला लस टोचल्यानंतर त्याची नोंद 'भारत पशुधन प्रणाली' (छऊङच् झोींरश्र) या केंद्र सरकारच्या अधिकृत पोर्टलवर रिअल-टाइम (तात्काळ) करणे आवश्यक आहे. पशुधनाचे टॅगिंग (१२ अंकी बिल्ला) करूनच ही नोंदणी केली जावी, जेणेकरून मोहिमेच्या प्रगतीवर थेट देखरेख ठेवता येईल व बोगस नोंदींना आळा बसेल.

# इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांचा मुल्यमापन निकाल संकेत स्थळावर जाहीर

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- महाराष्ट्र मुक्त विद्यालय मंडळ, पुणेमार्फत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या विभागीय मंडळामार्फत इयत्ता ५ वी प्राथमिक स्तर व इयत्ता ८ वी उच्च प्राथमिक स्तराच्या मूल्यमापनासाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यासाठी १५ एप्रिल ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत मूल्यमापन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या मूल्यमापनाचा निकाल्ु.ीर्ाीे.ाह-ीील.रल.ळप या संकेतस्थळावर ११ जून २०२६ रोजी जाहिर करण्यात आला आहे.

या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची विषयनिहाय श्रेणी दर्शविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना सदर माहितीची प्रिंट घेता येईल. पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे इयत्ता ५ वी ते ८ वी ची अर्हता व विद्याविषयक कौशल्य प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र यथावकाश वितरीत करण्यात येईल असे आवाहन लातूर विभागीय मंडळाचे सचिव यांनी केले आहे.

# सामाजिक तेढ टाळण्यासाठी बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बैठक घ्या - दिपक केदार

## ऑल इंडिया पँथर सेनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले निवेदन

बीड /प्रतिनिधी

अनुसूचित जाती उपवर्गीकरणावरील संदिग्धता दूर करण्यासाठी बाळासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक आयोजित करावी अनुसूचित जाती (डउ) उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यात निर्माण झालेल्या संभ्रम आणि सामाजिक अस्वस्थता दूर करण्यासाठी ऑल इंडिया पँथर सेनेने महाराष्ट्र राज्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनात बदर समिती अहवालासंदर्भातील शंका दूर करण्यासाठी आदरणीय ड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली तातडीने सर्वपक्षीय व समाजप्रतिनिधींची बैठक बोलावण्याची मागणी करण्यात आली आहे.निवेदनात म्हटले आहे की, उपवर्गीकरणासाठी आधारभूत असलेल्या बदर समितीच्या अहवालाबाबत विविध स्तरांवर प्रश्न उपस्थित होत आहेत. यामुळे अनुसूचित जाती समाजात संभ्रम, अस्वस्थता वाढली असून सामाजिक तेढ, द्वेष आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यभर उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ आणि विरोधात आंदोलने सुरू असल्याने काही ठिकाणी दंगलसदृश परिस्थिती उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही.पारदर्शक चर्चेची मागणी ऑल इंडिया पँथर सेनेने विनंती केली आहे की, मंत्रालयात आयोजित करण्यात येणाऱ्या बैठकीत बदर समिती अहवाल, त्याचे आधार, निकष, लोकसंख्याविषयक आकडेवारी तसेच शासनाची भूमिका याबाबत पूर्ण पारदर्शक माहिती सादर करण्यात यावी. यामुळे समाजातील संदिग्धता दूर होऊन सामाजिक सौहार्द राखण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या निवेदनाची माहिती ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार यांच्या वतीने देण्यात आली. राज्य प्रवक्ते तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी प्रसार माध्यमांना याची माहिती दिली.ऑल इंडिया पँथर सेनेने राज्यातील वाढती सामाजिक अस्वस्थता लक्षात घेता या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



# राष्ट्रिय चर्मकार महासंघाच्या वेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा



प्रतिनिधी / अनिल चव्हाण

मिरखेल येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहा असे आवाहन बाळासाहेब धोंगडे यांनी केले. सविस्तर वृत्त असे की राष्ट्रीय चर्मकार महासंघ शाखा मिरखेल आयोजित अधिकमास निमित्ताने राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा महामेळावा श्री संत शिरोमणी गुरु रविदास महाराज मंदिर मिरखेल येथे दिनांक १२ जून २०२६ शुक्रवार रोजी दुपारी ठीक बारा वाजता आयोजित केला असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री आदरणीय श्री बबनरावजी घोलप तर विशेष उपस्थित म्हणून परभणी विधानसभेचे आमदार मा. श्री राहुल पाटील असणार आहेत या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष आदरणीय श्री माधवरावजी गायकवाड तसेच प्रमुख पाहुणे मा.संबा वाकूजी वाघमारे मराठवाडा संपर्क प्रमुख राष्ट्रीय चर्मकार महासंघ कार्यक्रमाचे उद्घाटक सुदाम सोपानराव चव्हाण राष्ट्रीय चर्मकार महासंघ ठाणे जिल्हा कार्य अध्यक्ष रामकिशन जी कांबळे मराठवाडा उपाध्यक्ष राष्ट्रीय चर्मकार महासंघ तथा अध्यक्ष गुरु .रविदास महाराज प्रतिष्ठान परभणी पुणे येथील रहिवासी असलेले समाजसेवक आबा महादेव सातपुते यांचीही उपस्थिती राहणार आहे

मुरलीधर भागोजी ठोंबरे जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय चर्मकार महासंघ परभणी यांचीही उपस्थिती राहणार आहे या राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या मेळाव्या निमित्ताने चर्मकार समाजातील निराधार महिलांना विमल आबा सातपुते यांच्या तर्फे ६५ साडी वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे परभणी जिल्ह्यातील व तसेच बाहेरील सर्व समाजातील माता भगिनींना व समाज बांधवांना आव्हान करण्यात येते की आपण सहकुटुंब मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे परभणी जिल्हा संपर्क प्रमुख श्री बाळासाहेब धोंगडे यांनी केले आहे.

# गोवंश कत्तल प्रकरणात आणखी चार आरोपींना अटक

माजलगाव (प्रतिनिधी)

शहरातील गोवंश कत्तल प्रकरणात शहर पोलिसांनी आणखी चार आरोपींना अटक केल्याने आता या प्रकरणातील आरोपींची संख्या सहावर पोहोचली आहे.या प्रकरणात एकूण दहा आरोपी निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

३० मे २०२६ रोजी मंजरथ रोडवरील जुन्या स्मशानभूमीच्या भागात गोवंशाची कत्तल करून पाय,मुंडके अन्य अवयव उघड्यावर टाकून देण्यात आले होते. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता.या गुन्ह्यात यापूर्वी इमरान शकील कुरेशी(रा. गांधनपुरा,माजलगाव)व जफर गफार कुरेशी(रा.खाटीक गल्ली,माजलगाव) यांना ३१ मे रोजी अटक करण्यात आली होती.पोलिसांनी याप्रकरणात ९ जून रोजी उस्मान नबी कुरेशी(वय ५०),अबुजर उस्मान कुरेशी (वय १८),अलीम उस्मान कुरेशी (वय २१),सर्व रा.महेबूब नगर,माजलगाव तसेच अजीम चुन्नूमिया कुरेशी (वय ३२, रा.कुरेशी गल्ली, माजलगाव)या चार आरोपींना ताब्यात घेतले गेले आहे.यातील आरोपिंची पोलिसांनी कसून चौकशी केली तर नक्कीच खऱ्या आरोपीला ताब्यात घेण्याचा मार्ग मिळु शकतो,अशी चर्चा शहरात चौका चौकात होत आहे.अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके,अंबाजोगाईचे सहायक पोलिस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय राठोड, पो.कॉ.बहिरवाळ,चव्हाण यांनी केली.